# कार्तिक हजारे



# पेरजागढ

## एक रहस्य

# पेरजागढ... एक रहस्य भाग १

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पेरजागढ... एक रहस्य

# भाग १

लेखक

कार्तिक गुलाब हजारे

# पेरजागढ... एक रहस्य भाग १


## लेखक... कार्तिक गुलाब हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com

फेसबुक... https//www.facebook.com... karthik hajare

पत्ता.. मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३...

मु. मिंथूर, पोस्ट: नवेगाव( पांडव), तालुका: नागभिड, जिल्हा: चंद्रपूर.



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २ ऑगस्ट २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.



वाचनाची आवड मला तशी लहानपणा- पासूनच होती. शाळेतही असताना अगदी एक कथाकार म्हणून माझी वेगळीच ख्याती होती. एखाद्या कल्पनेत आपण काय काय रचु शकतो? याची प्रचिती मला सुखदेवे सर नेहमी द्यायचे. अस्खलित प्रतिसादाने शाळेतील कित्येक संस्कृतिक भागात माझी आवर्जून निवड व्हायची. पण कालांतराने आर्थिक परिस्थिती मुळे माझी शाळा सुटली आणि अंगावर कर्तेपणाचा ओझा आला.

पण आवड कधीच मिटली नाही. वृत्तपत्रांत मी झळकत राहिलो.

कालांतराने तेही बंद झाले. कारण कामाच्या व्यापात मी अडकत राहिलो. पण सवयी प्रमाणे वि. स. खांडेकर, सुहास शिरवळकर अशा बऱ्याच लेखकांच्या पुस्तिका मी वाचून काढायचो. त्यातून माझ्यातल्या कलाकाराचा एक नवीन


जन्म व्हायचा. आणि मी परत शुरुवात केली.

"कुणाच्यातरी आठवणीत" ही माझी पहिली कविता. जी आजही बेधुंद लहरी माध्यमावर झळकते आहे. पुढे कथा, कविता, लेख, चारोळी असे बरेच प्रकार त्यात समावेश करू लागले. पण काहीतरी लिहायचं? हा प्रश्न मनातून जाईना. कादंबऱ्या वाचताना मी पात्रांची, भावनांची विचारसरणी व्यक्त करत गेलो. आणि नव्या जोमाने लिहायला लागलो.

शब्दांचा हा निरंतर प्रवास,
संपूच नये कधी...
आयुष्य जगुनी जावे,
शब्दांच्या परी..
असावे वळण आयुष्याला,
शब्दांच्या संगतीचे...
अगदी अश्रुसुद्धा गोठतात,
शब्दांच्या घरी...

लिहायला जितकी भीती वाटत नाही ना, एक प्रकारे ती भीती आपलं लिखाण दुसऱ्याकडे दिल्यावर वाटते. आपल्या भावना, आपले विचार त्यांना पटतील का? आपलं लिखाण त्यांना आवडेल का? पण केला प्रयत्न... आणि थोडाफार यशस्वी झालो. आणि आता त्याच थोड्याफार प्रयत्नाने लिहत आहे.


आपला
कार्तिक हजारे




कार्तिक हजारे यांची पुस्तके.

त्यांच्या या कव्हरवर क्लिक केल्यावर ते ते पुस्तक उघडेल.

वाचायलाच हवीत ही पुस्तकं.




वाचायलाच हवीत ही पुस्तकं.

वाचून झाल्यावर कशी वाटली ते कळवा.

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com



## अभिप्राय... दुर्गा सुरेश जराते

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार. तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार...

ई साहित्यवरील मीसुद्धा एक वाचकच आहे. आणि बऱ्याच पुस्तिका वाचत असते. जे डोळ्यांनी बघतो ते खरं मानणाऱ्यापैकी मी एक आहेच. परंतु जे बघता येत नाही, ते डोळ्यांदेखत असते असे सत्व मान्य करणारे बरेच कमी आहेत. "पेरजागढ... एक रहस्य" ही एक रहस्यमय कथा, लेखकाने खूप छानपणे रेखाटली आहे.

मला वाचत असताना जी उत्कंठा लागली होती, की आता पुढे काय होणार? काय घडलं असेल नेमकं? काय वळण घेईल प्रकरण? या प्रश्नार्थक साखळीने गुंतवणूक करून ठेवण्यात लेखक नक्कीच यशस्वी झाले आहेत.

प्रस्तुत कथेमध्ये लेखकाने पवन आणि रितूची लव्हस्टोरी, पवन - आईचं प्रेम, अमर -प्रदीप -नमन - सदू यांच्याशी असलेली मैत्री. आणि या सगळ्या पात्रांना एकवटून एक रहस्य गुंतवलेले आहे. मृत्यूचं... शेवटी जेव्हा नमनने ती थैली पवनला दिली. तेव्हा वाटलं की, काय तो

मार्ग निघेल? परंतु लेखकाने जो सस्पेन्स ठेवला आहे. तो फारच अप्रतिम आहे. जे वाचकांना सुद्धा नक्कीच आवडेल.

ई साहित्य वरील लेखकाचे "प्रेमाचे अस्तित्व", "काही राहून गेलं होतं" आणि "मुक्ती" या कथांच्या माध्यमातून त्यांनी त्यांचं जे उत्तम लिखाण सादर केलंय. ते खरंच विचार करायला लावणारे आहेत. आणि मलाही ते वाचायला आवडलेच.

मला नक्कीच आशा आहे की, सत्य आणि सत्वाच्या पलीकडे असलेली ही रहस्यमय कथा. नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. आणि अश्याच पद्धतीने लेखकाने लेखन करावे ही आम्हा वाचकांकडून त्यांना शुभेच्छा...

दुर्गा सुरेश जराते.
ब्रम्हपुरी.

सत्य आणि सत्वाच्या वाटचालीवर पाऊल टाकताना, आम्ही खूप दूर आलोय याची सारखी प्रचिती येत होती. पण सगळ्या गोष्टींना गृहीत धरून थोड्याफार कल्पनेने रेखाटलेली ही भटकंती बुद्धिमत्ता, देवत्वाबद्दल असणारी श्रद्धा, गडाविषयी अतोनात प्रेम, नैसर्गिक महत्त्व आणि ऐतिहासिक असा जपलेला ठेवा. हे सगळं यात वर्गीकरण करण्यात आलं आहे. कित्येकदा वाघाची डरकाळी, अस्वलाचं गुरगुरणं आणि सापांचं सरपटणं अश्या बऱ्याच भयावह गोष्टींना आम्ही सामोरी गेलो.

कित्येक रहस्यांचा उलगडा करताना हृदयाची स्पंदने वाढून जायची. पण आज या प्रवासाला इतक्या चांगल्या पद्धतीने रंगवताना, मी कधीच बघितले नव्हते. इतर प्रवासासारखा हाही प्रवास काही क्षण चित्रांचा राहील असं मला वाटलं होतं. पण लेखकाने मनोरंजन, सत्वाचं अध्ययन आणि स्थळांची उलाढाल अश्या सगळ्या गोष्टींची पूर्तता अगदी तंतोतंत केली. ज्यामुळे हा प्रवास या पुस्तकाद्वारे आयुष्यातला एक अविस्मरणीय प्रसंग म्हणून डोळ्यासमोर ठेवला. त्याबद्दल मी लेखकाचे आभार मानतो. आणि त्यांच्या "पेरजागढ... एक रहस्य" या पहिल्या भागाला अनुसरून, पुढच्या भागासाठी शुभेच्छा प्रदान करतो.

पंकज माकोडे, नागपूर

नमस्कार...

वाचकांनी माझ्या तीनही पुस्तकांना बहुमतांनी अभिप्राय देऊन ही कादंबरी लिहून घेण्यास मला प्रवृत्त केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आणि बऱ्याच वाचकांच्या अपेक्षा लक्षात ठेवून, काहींच्या सुचना अगदी निदर्शनास ठेवून काहींची मदतही अंगीकारून इतर पुस्तकांचा संचपण, आपल्याला लवकरच मिळेल अशी मी खात्री बाळगतो. आणि सगळयांना गृहीत धरूनच लॉकडाऊनच्या काळात मी या कादंबरीची निर्मिती केली.

पेरजागढ हे एक ग्रामीण भागातील सात बहिणींचं गढ म्हणून ओळखण्यात येते. नागभिडवरून बारा किलोमीटर स्थित असलेल्या सोनापुर या गावापाशी ते वसले आहे. त्या गडाबद्दल बऱ्याच काही आख्यायिका आहे, ज्या मला शोधून काढायच्या होत्या. त्या एकाच पर्वतरांगेला ठिकठिकाणी दैवतांचा वास लाभलेला होता. मात्र सगळयांची आख्यायिका मात्र वेगळी. आणि बऱ्याच प्रमाणात असलेला ऐतिहासिकतेचा वारसा काही शोधाअंती आढळलेला होता. त्यामुळे मी एक टीम ठरवली आणि आम्ही त्या पर्वत रांगेचा प्रत्येक बाजूने अभ्यास करायचा ठरवला. कित्येक भयावह गोष्टींना सामोरी जात, त्यातले तथ्य अनुसरत, बऱ्याच गोष्टी आमच्या लक्ष्यात आल्या

होत्या. "भाऊ हसते म्हणून त्याचं गड घसरते, आणि बहीण रडते तर तिचं गड चढते" ही पेरजागडाची एक पूर्वापार आख्यायिका होती. नेमकं त्या ओळीत काय दडलंय? त्याचं शोध घेण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला. आणि अपेक्षेप्रमाणेच बरंच काही ऐकायला मिळालं?

इतिहास घडवण्यासाठी एक प्रसंगही किती महत्त्वाचा ठरतो याची जाणीव आम्हांस आली. सदर भागामध्ये फक्त त्याची शुरुवात झाली आहे. त्यामुळे वाचकांना कित्येकदा वाटेल की, प्रस्तुत कहाणी पेरजागडाशी संबंध तोडू पाहते आहे. पण त्याची शुरुवात हीच पेरजागडापासून कितीतरी लांबणीवर झाली होती. सदर कथेमध्ये मी प्रवासाचा वर्णन, तिथे असलेल्या लोकांची मते आणि काही सोशल मीडियाचा वापर केला आहे. ज्यामुळे लिहिताना काही खऱ्या गोष्टींची सुद्धा नोंद झाली आहे.

लिहिण्याचा माझा हा एक प्रयत्न होता की, सध्या फॉरेस्टच्या मर्यादेचे पालन करता, अशी बरीच देवस्थाने त्या जंगलामध्ये विलीन होत आहेत. पेरजागड हे एक निसर्गरम्य ठिकाण आहे. हे लाखो पर्यटकांना माहीतच असेल. आणि गडाची शान फक्त गडच असते त्याचं आवार नाही. पण जेव्हा गडच नसेल तर इतरांच्या श्रद्धेचा काय होणार? हा एक प्रश्न सुद्धा मनाला सतावत होताच.

इतर पुस्तिका लिहिताना फक्त कल्पना डोळ्यासमोर होत्या. पण पेरजागड लिहिताना सारखा एक आभास कानाशी गुंजत होता.

डोळ्यांसमोर असलेलं सत्य आणि डोळ्यांदेखत असलेलं सत्व ह्या दोनच गोष्टी तेव्हा मायने करत होत्या.

इ साहित्याच्या चालू असलेल्या घडामोडीला माझा नेहमीच हातभार असेल. त्यामुळे मी श्री. सुनील सामंत आणि ई साहित्य टीमचं अभर व्यक्त करतो. आणि खास वाचकांच्या आग्रहास्तव सादर करतो...

" पेरजागड... एक रहस्य"

भाग... १

कार्तिक हजारे

अर्पण पत्रिका

सदर कथा सर्व ज्ञात आणि अज्ञात रसिकांना समर्पित,
तसेच वेळोवेळी मदत करणाऱ्या माझ्या सर्व मित्रमैत्रिणीस
समर्पित...

## १) पवनचे सोनापुरात आगमन...

मनात कितीतरी प्रश्नांचा विचार चालू होता, तिचं काय झालं असेल...? तिने आत्महत्या तर केली नसेल...? माझे मित्र ज्यांनी मला शोधण्यासाठी किती कष्ट घेतले असतील...? आज दिवस कोणता आहे? कोणता वार आहे? काहीच सुचत नव्हते. सगळ्या मनाची घालमेल झाली होती. पण स्वतःची घृणा मात्र होऊ लागली होती. मी तुच्छ आहे आणि असणारच. कारण सत्व म्हणजे परब्रम्ह आहे. त्याची उपासना, त्याचे अस्तित्व असे शब्दात सांगायचे नाही. त्याचे आवाहन म्हणजे माझे फक्त कुतूहल होते पण त्यापोटी मी काय करून बसलो होतो? स्वतःचे अस्तित्व विसरुन गेलो होतो. विसरून गेलो होतो की ज्याने आम्हाला घडवले आहे, त्याच्या समोर आपण एक तुच्छ प्राणी आहोत. आणि आपण त्यालाच शोधायला निघालो होतो. ते पण मनात निगेटिव्ह विचार ठेवून. कदाचित हीच ती चुकी असेल ज्याने माझे आयुष्य असे अंधारात गेले होते.

सत्य जेवढं गुपित असेल तेवढंच बरं, हे आज माझ्या लक्षात आलं होतं. निर्धारित मनाने सर्वसाधारण माणसाचा ही शक्तिमान बनू

शकतो, याची मला प्रचिती आली होतीच. पण ते तिथेच व्यवस्थित आहे, असेही वाटायला लागले होते. उत्सुकतेने मी बऱ्याच नियमांचं उल्लंघन केलं होतं. आणि त्याची शिक्षा पण अशी अतोनात मिळाली होती. जी आजतागायत एक कोडंच उरली आहे.

गडाच्या पायथ्याशी पोचलो होतो... दूर कुठूनतरी कुबट असा मांस सडल्याचा वास येत होता... थरकाप सुटत होता... कसं करावं? काय करावं? ... काही सुचत नव्हतं. नवीन नव्हतं माझ्यासाठी. कारण इतक्यात बरंच काही सोसलं होतं. उतरतीच्या खडकाळ पायऱ्या असूनही तेवढाच दम छातीत भरू लागला होता... अचानक पैजनांची छम छम एकामागोमाग एक अशी कानामागे येत होती.. मी घाबरत होतो. कित्येक दिवसांनी हा उजेड माझ्या डोळ्यांना आधीच प्रखर वाटत होता. आणि त्या भासाने कपाळावर घामाचे ओघळ वाहू लागले होते. आता कसंही करून इथून निघायला हवे. हेच मला सुचत होते.

आभासी वास्तव्य कदाचित यालाच म्हणत असतील असं मला निदान त्यावेळी तरी स्पष्टपणे वाटत होतं... पण मागे बघावं तर रिकामी पायवाट आणि हळूवार वाऱ्याच्या झोकाने हलणारे शिलेवरील गवत मात्र डोलत होते. प्रत्येक पावलावर मला ते छमछम माझ्या कानाशी स्पष्ट ऐकू येत होते, कि माझ्या मागे कुणी पैंजण लावून चालत आहे. त्यामुळे मी अजून थोडासा घाबरुन गेलो होतो. आवाजानजिक

सारखं इकडे तिकडे माझ्या नजरा वळत होत्या. आणि हृदयात एक कंपन झाल्यासारखं जाणवत होतं.

जिवाची आकांती मला तिथून पळ काढण्यास भाग पाडत होती... उतराईमध्ये दगडाळ वाटेवरून पळायला पण जमत नव्हते... कारण चुकून जरी का मला तोल सावरता आला नसता तर वरून आपण बघु पण शकत नाही.. इतक्या खोल दऱ्या तिथे होत्या... त्यामुळे सारखं इकडे तिकडे बघत मी लवकरात लवकर गाव गाठण्याच्या तयारीत होतो. कारण इतक्यात मी एकही मानवाचं रूप बघितलं नव्हतं. तरसलो होतो आता एखाद्या मानवाला बघण्यासाठी.

बाजूलाच नागोबाची मूर्ती दिसली... त्या मूर्तीला मी नजरेनंच घेरलं.. कारण त्याचीच कृपा म्हणावी की त्यानं स्वतःचं असं दर्शन दिलं होतं. आणि पावलानजिक वाढणारी छमछम मला माझ्या मृत्यूचं कारण असल्याचं चिन्हं दाखवत होती... आणि मागे बघावं... तर निसर्गाचा देखावा फक्त तेव्हढा दिसत होता... मग हे अदृश्य आवाज मलाच का येत असावं...? काय असावं त्याचं कारण? जे तेव्हाही एक कोडं होतं, आणि आत्ताही एक कोडेच आहे...

मग येणारी ही चाहूल यमराजाची तर नसेल... पण तो पैंजण कशाला घालून येणार? विधात्याने त्याला रेडा साधन म्हणून दिलं आहे... तो त्याचाच वापर करणार ना!!एकीकडे जीवाची आकांत होती आणि एकीकडे परत जिज्ञासा. तरीही मनात विचारांचे काहूर ताजेच होते. पण उत्तर अजूनही मिळत नव्हते. कारण मी एक प्रश्नचिन्ह आहे हे तेव्हा तरी मला कळणार नव्हते.

शेवटी थकत भागत दोन किलोमीटर जंगल उरलं असेल. खालचं मंदिर यायला... तिथपर्यंत मी आलो होतो... कोपऱ्यावर एक दत्ताची मूर्ती दिसली.. आता त्यालाही जगण्याची भिक्षा मागावी याव्यतिरिक्त माझ्याकडे काहीच साधन नव्हतं... कारण शेवटी जीव मेटाकुटीला आला होताच. आणि क्षणक्षणाला ती चाहूल माझं जीव घेण्याचं प्रयत्न करत होती.

घामाने पूर्ण अंग ओलेचिंब झाले होते... अंघोळ झाली होती माझी... शेवटी धावून धावून थकलेला मी... असं वाटतं होत... की चक्कर येऊन आता पडेन की नंतर पडेन... आणि घरंगळत जावून नक्कीच कोणाचंतरी भक्ष्य बनेन.. छाती इतकी भरून आली होती, की दोन मिनिटे कुठे थांबुन श्वास घेण्याची माझी ताकद नव्हती... आणि जसजसं मी गड उतरत होतो, तसतसं मागे फिरून बघण्याची पण हिम्मत होत नव्हती.

उतराईचा अर्धा टप्पा मी गाठला होता. जेव्हा जलकुंभावर माझी नजर गेली. तेव्हा मला वाटलं, पण जाऊन थोडं पाणी प्यावं ही सुद्धा हिम्मत होत नव्हती. अख्खं जंगल, ते गड मला खायला उठलं आहे, आणि ते कशाचंही निमित्त होऊ शकते. वर ते जलकुंभ पण गडाच्या पायथ्याशीच होते. ज्या दगडांची ठेवण, रचन बघायला मला जिथे थांबायचं होतं. तिथूनच माझा आता पळ काढण्याचा विचार चालु होता.

समोर आता उतरायला अजून खडकाळ वाट होती.. आणि पावसाळा सुरू असल्यामुळे शेवाळ जिथे तिथे उगवले होते... ज्यामुळे पाय घसरून पडण्याची दाट शक्यता होती... पैंजणांचा आवाज मात्र कानोकान तितकाच स्पष्ट मला येत होता.. वर कुणी किंकाळत होतं.. तर कुणी ओरडत होतं.. त्या आर्त स्वरांनी माझी क्षणाक्षणाला जगण्याची हिम्मत कमी होत होती... आणि मी पण तेवढ्याच चिकाटीने पळत होतो.. एका पिंजऱ्यातून सुटलेल्या जनावरासारखा.

ट्रॅकिंग करत असताना मी कित्येक जंगल तुडविली असेल पण या जंगलात मला विचित्र वाटायला लागले होते... तितक्या दुपारची वेळ असूनही मी अजुनही एकाही प्राण्याचा किंवा पक्ष्याचा आवाज

ऐकला नव्हता. रात्रीला असलेल्या शांततेत सुद्धा रातकिड्यांचा गजरणाद सुरु असतो. परंतु इथे कमालीची भयानक शांतता होती. जीवाला वाचवण्यासाठी मी आटोकाट प्रयत्न करत होतो. धावून धावून पोट खोलावर गेलं होतं... जीभ पण लोंबकळायला लागली होती... पण आतापर्यंत कसलाही प्रतिकार माझ्यासोबत होत नाही हे बघुन मी थोडा सावरलो... आता मी सुटकेच्या अंतिम टप्प्यावर आहे असे मला वाटायला लागले होते.

तितक्यात समोर गणेशाची मूर्ती दिसली, तिला ही नमन करून मी सुखरूप घरी पोचवण्याची विनंती करु लागलो. माणूस जेव्हा संकटात सापडतो तेव्हा त्याचं असंच होतं. आता माझंच बघा ना!!! किती देवांच्या पायी पडत आलो. कित्येकांना स्मरलं मी माझं जीव वाचवण्यासाठी. इतरांसारखी माझी अवस्था होवू नये म्हणून... आता नेमकं एखाद किलोमीटर अंतर उरलं असेल. मला जगण्यासाठी पुरेसे काही क्षण. पुरेशी काही वाट.

अख्खं जीव एकवटून मी धावत होतो. नाकातून, तोंडातून श्वास जोराजोरात घेतला जात होता. ज्याचा आवाज दूर दूर पर्यंत घुमत होता... आणि आता माझं एकवटलेलं शरीर साथ सोडायला लागलं. पण मी आता जवळच पोहचलोय या नादात प्रयत्न करत होतो. मी आता बाहेर पडू शकणार नाही हा विचार थकवा घालू लागला होता.

दुरूनच गेट दिसला आणि सिमेंटच्या पायऱ्या लागल्या. पण समोरचं दृश्य पाहून मी अजुनच गर्भगळीत झालो. गेटपाशी कुणीतरी उभा असल्याची प्रचिती मला आली आणि दुरूनच त्याच्या खांद्यावर तो काही धरून असल्याच मला जाणवलं. माझी एकवटलेली शक्ति तिकडे बघूनच क्षीण होऊ लागली होती.

आता जे होईल ते होईल अशी आस्था मनात ठेवून मी माझे पळते असणारे शरीर सैल सोडले. आणि तेवढ्यातच माझा पाय घसरून मी घरंगळत एखाद्या दगडाप्रमाणे खाली आलो होतो. कारण आता माझ्या अंगात काहीही सामर्थ्य उरले नव्हते. घरंगळत आल्यामुळे माझ्या अंगाला बऱ्याच जागी खरचटले होते. पण ते बघायचे सुद्धा आता माझ्यात त्राण उरले नव्हते. आणि हळूहळू मी माझे डोळे मिटले. कारण ते उघडण्याचे सामर्थ्य माझ्यातून केव्हाच निघून गेले होते. कदाचित मी ते शेवटचे समजून मिटले होते, का कोण जाणे? पण आता माझी जीव वाचवण्यासाठी असलेली धडपड बंद झाली होती... आणि आता माझा प्रवास कुठे संपला होता ते माझे मलाच माहित नव्हते.

आता सांगायचे म्हणजे मी कोण? मी तिथे कशाला गेलो असेल? ती जागा काय असेल? काय झालं माझ्यासोबत तिथे? मी

एकटाच होतो काय तिथे? अश्या पद्धतीचे पुष्कळ प्रश्न तुम्हाला पडले असतील आणि साहजिकच तुम्हाला ते जाणून घेणे तुमचा अधिकार आहे.

मी भटकंती करणारा एक साधारण तुमच्यापैकीच एक होतो आणि ज्या जागेबाबत मी तुम्हाला सांगत आहे त्याचे नाव आहे "पेरजागड". ज्याला विदर्भात "सात बहिणींचे डोंगर" असे म्हणून मान्यता आहे. ज्या बद्दल बऱ्याच काही आख्यायिका गावातील बुजुर्ग मंडळी मोठ्या चवीने आज पण सांगतात. आणि कसं आहे जिथे विज्ञान संपते तिथे अध्यात्म सुरू होते ही म्हण कुणीतरी महान व्यक्तीने बोलली होती. त्यातलेच हे एक उदाहरण म्हटले तरी चालेल. आपण एखाद्या विशिष्ट स्थळांचा जेव्हा आस्वाद घेण्यासाठी जातो. तिथे फक्त जितकं दाखवलं जातं किंवा जितकं दिसते तितकेच आपण मानतो. पण सत्याच्या पलीकडलेही अजून काही सत्य आहेत, जे आपल्या लक्षात येत नाही. किंवा ते आपल्या बुद्ध ीमत्तेच्या पलिकडले असते. पण त्याची पूर्तता केली तर खरोखर अगदी तंतोतंत आहेत. आणि आज मी त्याच सत्याच्या पलीकडले शोधण्यासाठी इथे आलो आहे.

जग किती बदललंय याची प्रचिती आज तुम्हाला कुणीही देवू शकेल. या जगाला कलियुग असे म्हटले आहे. आज हे उदाहरण खास त्यांच्यासाठी आहे ज्यांनी हा युग अनुभवला आहे पण त्यामागचे सत्य

नाही. कारण ते सगळ अनुभवायला लागणारी आत्मसात नावाची जी शक्ती आहे, माणूस तेच विसरत चालला आहे.

आपण इतके सुपरहिरो बघतो कुठल्या ना कुठल्या कारणाने त्यांच्या शरीरात ह्यूमन बॉडीचा विकास होऊन एका अज्ञात शक्तीचे स्वामित्व त्यांना लाभते. पण या पलीकडेही काही शक्ती आहेत जे साधारण मानव सुध्दा विकास करू शकतो. त्याला म्हणतात मौनधारणा. जर आपल्या शरीरातील पंचेंद्रिये जागृत झाली तर मनुष्य असाधारण शक्तीचा राजा बनू शकतो हे कितीतरी सिद्धांतात मांडले गेले आहे. पण पूर्वजांपेक्षा आज माणसाची श्रद्धा, शक्ती, सामर्थ्य ही कमी होत चालली आहे... आणि त्यामुळे त्यांच्या जीवनातील काही कालावधी कमी होत आहे.

पुर्वी माणूस घागरीत भात शिजवून घेत होता, आज स्टीलच्या भांड्यात शिजवुन खातो. निसर्गाचं देणं खात असताना, हव्यासापायी नको त्या औषधीचा वापर करू लागला. आणि त्यामुळे अल्कोहोलचे प्रमाण वाढले व नव नवीन रोग उद्भवू लागले. पूर्वीचं जीवन सहज नव्हतं पण आजच्या सोप्या जीवनापेक्षा तेच जीवन सुखी होतं. कारण आजचा माणूस स्वार्थी आणि ऐश आराम करणारा झाला आहे. की त्याला पाप काय? पुण्य काय? हे सुद्धा कळेनासे झाले आहे.

माणसाची सगळ्यात मोठी शक्ती वैचारिक शक्ती, सगळ्यात मोठी स्थिती मानसिक स्थिती, सगळ्यात मोठं दुःख ताण तणाव. पूर्वीच्या काळात वरील कोणत्याही गोष्टीचा प्रादुर्भाव माणसावर नव्हता. पण हल्ली प्रत्येक व्यक्ती एका तरी व्याधीने त्रस्त आहे व त्यासाठी मोठमोठे तज्ञांमार्फत ते आपले नको ते हाल करून घेत आहेत.

जग इतकं बदलत जात आहे की लोक एखाद्याच्या श्रद्धेची टिंगल उडवायला पण मागे पुढे पाहत नाही. आणि त्यामुळे सत्व नाहीसे होत आहे. जर सत्व नाहीसे झाले तर मनुष्य जगणार कश्या प्रकारे? क्षितीज कधी कुणी पार केलंय का? क्षितिज म्हणजे सीमा हे मात्र आपण ठरवतो. आणि जसजसं समोर जातो ती सीमापण वाढत जाते. तसेच सत्व म्हणजे एक श्रद्धा असते ती अंतर्मनातुन केली जाते आणि त्याची सुरुवात ही अध्यात्मा पासून होते.

मानवी शरीराद्वारे जे जिवन आपणास प्राप्त झाले आहे. ते निसर्गाच्या नियमानुसार चालावे असा क्रम आहे, पण सगळं काही उलट होतंय. माणूस अज्ञान, अहंकार, अंधश्रद्धा आणि अभिमान यांच्या आहारी जाऊन जीवनाचे दिवाळे काढत आहे. आयुष्याचं उहापोह करत आहे.

निसर्गासारखे आई वडील कोणीच नाही. पोट भरण्यासाठी माणसाने काम करावे हा निसर्गाचा नियम आहे. निसर्गाचा हा नियम लाथाडून जी माणसे काम करण्यात टाळाटाळ करतात तेव्हा माझ्या मते निसर्गाच्या विरुद्ध वर्तन करीत असतात. म्हणून त्यांना असं भोगायला येते की निसर्गाकडून त्यांना अतिशय कठीनाईचे प्रसंग येतात.. थोडक्यात माणसाच्या ठायी असलेली भूक ही प्रेरणा म्हणजे वैश्विक जिवन व्यवस्थापन करण्यासाठी निसर्गानं केलेली सुरेख योजना आहे. आहार, निद्रा, भय या क्रिया सर्व प्राण्यांमध्ये सारख्याच आहेत. परंतु मनुष्य प्राण्यांपेक्षा विकट परिस्थितीत पोहोचला आहे. थोर संतांनी अशी कितरी उदाहरणे दिली आहेत परंतु या निरोगी शरीराशी निगडीत आहेत. त्यांनी केलेलं मार्गदर्शन व दिलेलं ज्ञान हे धूळ खात असलेले फक्त ग्रंथ राहिलं आहे. ज्यामुळे या कलियुगाचा शेवट लवकर होईल ही खात्री आहे.

## २)शुरुवात...

मी पवन भांडारकर. नवीन स्थळांची भेट घेवून माहिती काढणे, आणि त्या विषयी लोकप्रिय दंतकथानुरुप त्याचे महत्त्व लोकांना पटवून देणे हा माझा आवडता छंद. त्यातले तथ्य, आणि निसर्गाची आगळी वेगळी रूपे बघण्यात मला फार मजा यायची. त्यासाठी दरवर्षी मी सतत कुठे ना कुठे नवीन स्थळांवर फिरायला जायचो.

सातपुडा पर्वतरांग उतरताना मला पडलेला एक प्रश्न? मी भटकंती करणारा एक ट्रॅकर. नुकतंच एक नवीन चॅनल सुरु केले होते. ज्यात जगातील काही आश्चर्यकारक व रहस्यमय गोष्टी जगासमोर आणणे हा माझा उ्देश होता. आणि त्यासाठी मी रात्रंदिवस महाराष्ट्रातील कित्येक डोंगरदऱ्या पायी तुडवल्या होत्या. कित्येक स्थळांची मी नोंद केली होती, जी कुणी बघितली पण नव्हती.

अशी कितीतरी स्थळे मी बघितली होती. तेव्हा मला असं कळलं की प्रत्येक देव देवतेची निर्मिती ही कुण्या ना कुण्या कारणाने झाली आहे. बुजुर्ग मंडळीच्या मते तिथे काहीतरी अदृश्य शक्तींचं वास्तव्य असते... कारण शेवटी ती श्रद्धाच असते जी दगडाला पण

देवपण आणते. आणि आपण कितीदा पाहिलं किवा ऐकलं पण आहे की शास्त्रज्ञ सुद्धा या गोष्टीवर विश्वास ठेवायला लागले आहेत.

मध्य प्रदेशात सातपुडा पर्वतात चौरागढ अद्वितीय प्रेक्षणीय स्थळ आहे. ज्यावर शिव शंकर म्हणजे भोलेनाथ देवतेने तपश्चर्या केली. पण काही कारणास्तव त्यांनी तिथून पलायन केले... अशी माहिती मला तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी कडून कळली.

तेव्हाच ठरवलं आपल्या महाराष्ट्रात असे अनेक प्रेक्षणीय स्थळ आहेत आपण त्याचाच शोध करूया... कितीतरी दिवस कुठे जावे कुठे नाही मला काही कळत नव्हते. पावसाळा असल्यामुळे जास्त करुन स्थळ बंद करण्यात आले होते. पण प्रकृतीची अस्सल छटा तर पावसाळ्यातच दिसून येते.

तेवढ्यात मला माझ्या मित्राचा फोन आला. त्याने मला आपल्या गावी येण्याचे आमंत्रण दिले. मी पण बॅग भरली. कारण याच निमित्ताने माझे फिरणे पण होणार होते. चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड शहर तेथील तो रहिवासी होता. मला माहिती नव्हते की माझ्या इतक्या जवळ पण प्राकृतिक सुंदरता आणि अनेक प्रेक्षणीय स्थळ आहेत. आणि सोबतच ईथल्या भागात अनेक रहस्य दडले आहेत म्हणून.

त्यामुळे वेळ न घालवता दुसऱ्या दिवशी मी सकाळी तयारी केली व आपला कॅमेरा आणि इतर गरजेच्या वस्तू सोबत घेतल्या, आणि निघालो एका नव्या संशोधनात. पण मला काय माहिती होते? की नियती ने माझ्यासाठी आणखीच काही ठरवले होते.

मी नागभीडला अवघ्या काही तासातच पोहोचलो. माझा मित्र बसस्टॉप वर माझी वाट बघत बसलाच होता. उतरता बरोबरच त्याने माझे स्वागत केले. कारण खरंतर त्याने माझ्या येण्याची आशा केली नव्हती. तिथून आम्ही त्याच्या घरी गेलो. फ्रेश होऊन आम्ही जेवण केले. माझ्यासाठी हा एक सुखद अनुभव होता. कारण याआधी मी कधी विदर्भात कुणाकडे राहिलो नव्हतो. आणि तिथली ती आपुलकी माझ्यासाठी नवीन होती. सायंकाळी जेव्हा मी गावात फेरफटका मारला. तेथील वातावरण खूपच मनमोहक वाटले. इतके दिवस शहरांतल्या गर्दीत मी हा एकांत कसा गमावला याचे मला नवल वाटत होते. मला तिथे आल्यापासून एक वेगळंच भास होत होतं. काहीतरी नवीन आपल्या जीवनात घडणार असे ठामपणे वाटत होते.

सुरुवात आम्ही शिव टेम्पल पासून करण्याचे ठरवले. ते सर्वात जवळचे ठिकाण होते. एका उंच पर्वतावर शिवशंकराचे अस्तित्व या

छोट्या शहरात असेल असे वाटले नव्हते. पण तिथे काही रहस्य दडले आहे? हे मला माहीत नव्हते. मंदिरापर्यंत ज्या शिड्या तयार केल्या आहेत सर्वसामान्य माणसाला तिथपर्यंतच जाता येते. पण तिथूनच वर जायला एक अरुंद पाऊलवाट होती. जी त्याच जंगलातून आहे... आणि तिथून डोंगर चढत असताना आपण अजुन उंचावर जातोय अशी खात्री होते.

जवळपास ५०० ते ६०० मिटर चढाई केल्यावर आपणास तीच पाऊलवाट डोंगराच्या माथ्यावर पोहोचवते... परत तिथून काही अंतर गेल्यावर समोर डोंगराचा रुंद माथा आपल्याला दिसून येतो... आणि त्या मध्य भागी उजव्या बाजूला कोपऱ्यात काही शेंदुर माखलेल्या मुर्त्या आहेत. आश्चर्य म्हणजे तिथे त्यांची पूजा केलेली मला दिसले. पण माझ्या मित्राला विचारलें तर तो म्हणाला: इथे कोणीच येत नाही. आणि आजपर्यंत त्याने कुणाला इथे पूजा करताना बघितले सुद्धा नाही. कारण तो कितीतरीदा या भागात फिरलेला होता. आणि त्याच्या साठी काही हे नवीन नव्हते.

वर डोंगराच्या कडेला असलेली त्यांची स्थापना ही कुणालाही अचंभित करणारी होती. कारण त्या मुर्त्या आजपर्यंत कुणालाही दिसल्या नव्हत्या. शिवाय आणखी बरेच काही असल्याचं मला कळलं. तीच डोंगररांग शेवटी घोडाझरीला येवून मिळते... घोडाझरी

एक ब्रिटिशकालीन तलाव आहे. घोडाझरीचा अगम्य परिसर आणि तिथला तलाव इथल्या लोकांसाठी एक समुद्राची उपमा देतो. तिथे असलेल्या बोटींगसाठी बरेच लोक तिथं येत असतात. आणि सोबत संपूर्ण निसर्गाचा देखावा बघत असत◌ात. काय अप्रतिम दिसते ते सौंदर्य. पावसाळी दिवसांत जेव्हा तलाव भरतीला येतो तेव्हा गावकरी तिथे आंघोळीचा आस्वाद घ्यायला येतात.

जेव्हा पावसाचा जोर वाढतो तेव्हा तेथील मासेमारी करणारे लोक तिथे जात असतात. एक एक करुन मला इथल्या गोष्टी आपल्याकडे आकर्षित करत होत्या. त्यामुळे माझी ईच्छा आणखी माहिती गोळा करण्यासाठी तीव्र होत होती. शिवाय मला एका नवीन स्थानाबद्दल माहिती मिळाली होती. ती म्हणजे पेरजागड, मुक्ताई, आंबाई निंबाई अश्या बऱ्याच स्थळांची यादी मला माझ्या मित्राकडून कळली. आणि त्या सोबत काही दंतकथा प्रचलित आहे हे पण मला कळले. त्याचा उलगडा करण्यासाठी माझे कुतूहल वाढू लागले होते.

मला वाटते बहुतेक ती शिवरात्र असेल जेव्हा मी गडावर पहिले पाऊल ठेवले होते. आणि एक योगायोगही. विदर्भात दरवर्षी पडत असलेला दुष्काळ बघून शासनाने तेहतीस कोटी झाडे लावण्याचा उपक्रम राबवला होता. त्यामुळे जितका जंगली भाग होता तो बंद करण्यात आला होता. आणि पावसाळयात ही स्थळे बऱ्याच प्रमाणात बंद असत. आणि पेरजागढ बऱ्याच प्रमाणात फॉरेस्ट मध्ये गेलं होतं. त्यामुळे शेवटचं म्हणून आम्ही त्या गडावर जायचं ठरवलं.

जंगलातून प्रवास करीत आम्ही निघालो. खरंच त्या वेळेस दुरूनच मला ते पेरजागड फार अवर्णनीय वाटत होते. दैवसुध्दा कशा कशात वास करते? , याची प्रचिती मला त्या स्थानावर येत होती. असो दृष्टी आड सृष्टी आहे हे खरंच आहे. हा प्रवास माझ्या आयुष्यातील फार मोठा होता असं म्हटले तरी चालेल. कारण त्याआधी मी कित्येक स्थळाची माहिति काढली होती त्यांची सखोल चौकशी पण केली होती. पण या गडाची तर गोष्ट वेगळीच होती.

गावखेड्यात शिवरात्रीचा उत्सव म्हणजे जरा जोराचा असतो. आणि यानिमित्त गावात जत्रे सारखे कार्यक्रम होत असतात. रात्री नाटके सादर करण्यात येतात. गडावर तशीच जत्रा भरते. खाली जत्रा आणि वर पूजा वगैरे होते.

मी कधी माझ्या आजूबाजूचे गड किंवा प्रेक्षणीय स्थळ बघितले नव्हते. फक्त एक खात्री होती, की ज्या प्रकारे जग एक रहस्य आहे, आणि त्याची गणना आजपर्यंत झाली नाही. अख्ख्या जगाचा फक्त पाच टक्के अभ्यास झाला आहे आणि तोही अर्धवट. मग आपल्या भागात काही असायलाच हवं, हे मला वाटत होतं.

सत्वाबद्दल सांगायचं राहिलं तर त्या जुन्या काळात असले कितीतरी सत्व होते. जे आपण आज ओठावर उच्चारले तरी लोक हसल्याशिवाय राहणार नाही. त्यात तथ्य नाही, पण हे खरं आहे जर आपण एखाद्या व्यक्तीला म्हटलं की, एके काळी कुणी तिथे शोध घेत चक्क १८ महिने आणि सतरा दिवस न खाता पिता राहिला आहे तर ही एक थट्टा वाटेल. पण हे एक सत्य होते. तिथले जे अनुभव मला स्थानिक लोकांकडून कळाले. इतरांसारखे माझ्यासाठी पण हे एक नवलच होते.

सुरवातीला जेव्हा मी त्या गडावर जाण्यासाठी निघालो त्यावेळेस माझ्यासोबत दोन अद्भुत गोष्टी घडल्या.

जत्रेच्या दिवशी मला त्या गडावरची शांतता अनुभवता आली नाही. मात्र मला जे अनुभवता आले ते मात्र कॅमेऱ्यात कैद करून आणले. वाढत्या सुधारणेनुसार आता गडाच्या सभोवताल जी अरुंद पायवाट होती. तिथे रेलिंग लावल्या गेली होती. त्यामुळे तोल जाण्याची भीती कमी झाली होती. सौंदर्यानी नटलेले आणि लोककथेनी थाटलेले ते स्थान माझ्या काळजात असं उतरलं होतं की जस माझं आणि त्या गडाचं संबंध फार जवळचं आहे. काहीतरी नातं माझं त्या गडाशी जुळलेलं आहे असं सारखं मला वाटत होतं.

सौंदर्याची प्रत्येक गोष्ट अनुभवताना मी सूर्यास्ताचे विलीन दृश्य बघू लागलो. माथ्यावरून खडकाळ पण विरान पडलेलं ते गड भोवतालचा संपूर्ण परिसर आपल्याला दाखवतो. ज्यामुळे मन प्रसन्न झाल्याची जाणीव होते. ढगांचा प्रवास असं नकळत डोळ्यांनी आपण बघू शकतो. आणि खाली त्याचं प्रतिबिंब जणू एक खेळ खेळत असतो. आवडलं... मला ते ठिकाण फार आवडलं. पण निराशा ही तितकीच झाली की हे स्थान आता बंद होणार. सौंदर्यानं नटलेलं हे गड आता जंगलात विलुप्त होणार. असं नको व्हायला? हा विचार करत मी परतीचा प्रवास सुरु केला.

गडाच्या वरच्या पायऱ्या उतरून दुसऱ्या वळणावर लागलोच होतो की मला कुणाची तरी हाक आली. आणि मी वळून पाहिले. क्षणभर तो चेहरा बघितला, न्याहाळला आणि मी पळू लागलो त्या व्यक्तीपासुन. गर्दीत विलीन झालो. पण हा एक योगायोग होता. आज इतक्या वर्षांनी आम्ही त्या गडावर एकमेकांसमोर आलो होतो. शेवटी ती घाईघाईने मागोमाग आली. भर गर्दीत तिने माझा हात पकडला, आणि खेचत मला बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत टोकाशी नेले.

पळतच आहेस ना शेवट पर्यंत...

(मी फक्त गप्प उभा होतो)

अरे वेड्या बोल ना... आज तरी बोल.. असं किती दिवस पळतच राहणार.

ऐक रितू... प्लीज मला जाऊ दे... नकोत मला त्या गोष्टी परत...

मग का इतके दिवस माझ्यावर प्रेम केलं. मला सोडून जाताना तुला एकदाही माझ्याशी बोलावंसं नाही वाटलं. इतकी नकोशी झालेय तुला. पण त्याचं कारण काय? हे तरी सांगणार का मला?

परिस्थतीनुसार सगळं बदलते रितू... मग मीच काय वेगळा? ...

अजूनही लपवतो आहेस पवन... पण काय आजतरी नाही सांगणार का मला? इतकी परकी कधीच नव्हते रे तुझ्यासाठी?

वेळ आल्यावर कळेल तुला!!!

ती वेळ केव्हा येईल..? केव्हापासून वाट बघत आहे मी.. फोन करते तर उचलत नाही. कुठे भेटावं म्हटलं तर ठावठिकाणा नाही... काय

चाललंय काय तुझं? मला काहीच कळत नाही? का असा वागत आहेस?

मी तुझ्यावर प्रेम नाही करत ! जाऊ दे मला...

( तिला बाजूला सारत मी उतरू लागलो)

मित्र हे सगळं बघत होते. पण मी एकदाही परत मागे वळून बघण्याचा प्रयत्न केला नाही. मित्रांनी पण विचारणे योग्य समजले नाही. आणि त्यांना काही सांगण्याच्या स्थितीत पण मी नव्हतो. फक्त इतकं समाधान वाटले की ती आहे. आणि अजूनही माझ्यात आहे.

## ३) मृत्यूचे आगमन...

पेरजागडची छवी मनात ठेवून मी त्या दुसऱ्या दिवशी सकाळीच परत आलो. आज कितीतरी दिवसांनी मनामध्ये परत एकदा असमर्थता जाणवत होती. खरं तर ती माझं प्रेम होती. आणि आजही मी तिच्यावर तितकंच प्रेम करत होतो जितकं आधी करत होतो. मी कित्येक वेळा तिला विसरण्याचा प्रयत्न केला, पण नाही जमलं... जेव्हां आज इतक्या दिवसांनी ती मला भेटली तर साहजिकच ती माझ्या मागावर असणार. आणि शेवटी ती माझ्या मित्राला घेवून ती माझ्या घरी आलीच.

काय झालं काय आहे? काय चाललंय तुझं?

मी तुला कालच सांगितलं गडावर.

ते माझं उत्तर नाही पवन.. आज खरं खरं सांग... चार वर्ष झाली आज... मी पण निश्चय केला आहे... शेवटचं असेल तरी सांग.. पण आज मी ऐकल्याशिवाय इथुन जाणार नाही.

यावेळेस तिचा निश्चय बघून मलाही जरा गोंधळल्यागत झालं होतं... थोडं फार ह्रदय आक्रोश करू लागलं होतं. जे झालं त्यात कुणाचीही चुकी नव्हती. पण कदाचित माझा नकार हर एक प्रकारे तिच्यावर केलेला अन्यायच होता. थोडं नरमीत येऊन मी तिला म्हटलं. आपण बाहेर जावून बोलूया.

आठवतेय का रितू, तुझ्याशी ओळख झाल्यावर मी पंढरपूरला गेलो होतो. सद्याला धरुन एकूण पाच जण होतो आम्ही..

हो माहिती आहे मला? पण त्याचा इथे माझ्याशी काय संबंध..

जर तुला जाणुनच घ्यायचे आहे तर पूर्णच जाणून घे.. कारण तुला सोडल्याची जितकी खंत तुला आहे तितकीच मला पण आहे. जग कसं आहे डोळयादेखत असलेल्या गोष्टीला सत्य मानतात. पण त्याही पलीकडे अश्या अनेक गोष्टीचा वास असतो की आपण त्याची जाणीव कधीच करु शकत नाही. कारण जे घडणे आहे ते कधीतरी घडणारच ना.

पंढरपूर हे वारकऱ्यांचे देवस्थान आहे. प्रत्येक आषाढी कार्तिकीला वारकऱ्यांना तिथे देव दिसतो. त्यादिवशी मला तिथे माझा

काळ भेटला. त्या गर्दीतून जातांना अचानक मला कुणीतरी हाक मारली. माझ्या नावाची ती हाक ऐकताच मी थांबलो. खरं तर मला न ओळखीच्या प्रदेशात असं हाक मारल्यामुळे मी थोडा भांबावून गेलो होतो. पण कोण आहे ते बघण्यासाठी मी मागे फिरलो. जसं मी मागे वळून बघितलं, रस्त्याच्या कडेला एक वृद्ध इसम बसुन होता. त्याने शुभ्र वस्त्र परिधान केले होते. त्यांची पांढरी शुभ्र दाढी होती. डोक्यावर पांढरा शेला होता. आणि त्यांच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज होते.

मी आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे गेलो. त्यांनी माझं नाव - गाव, अत्ता-पत्ता एव्हाना मी काय करतोय? कुठे जातोय? हे सगळं सांगितलं. मी अजून आश्चर्यचकित झालो. पण म्हटलं माझं एकट्याच इतकं निरीक्षण, इतकी माहिती, हे स्वार्थापायी तर सांगत नसणार. नक्कीच यामागे काहीतरी कारण असणार. त्यामुळे ते जे सांगत होते ते मी सुन्न होवून ऐकत होतो. तितक्यात माझे मित्र पण माझा शोध घेत आलेले होते.

ते म्हणाले... बाळांनो तुम्ही इथे आलात... पण तुमचं नशिब काय म्हणते? माहीत आहे काय? उत्सुकता फार चांगली गोष्ट आहे, पण काही वेळा उत्साह वेगळ्या वळनाला लावते. तुमच्या बाबतीत सांगायचं म्हणजे काळ तुमच्या मागे लागला आहे, त्याचा तुम्हाला नेमसुद्धा नाही.

आजचं विश्व म्हणजे कलियुग म्हणून संबोधल्या जाते. कारण डोळ्या समोर जे घडते त्यालाच सृष्टी म्हटले जाते. इथे सत्य काय? वास्तव काय? अस्तित्व काय? कशाचंही लेनं नाही, किंवा आपण कसे जगत आहोत त्याचं पण भान नाही. बस जसं जग जगते तसं जगायचं आणि जसं जग मरते तसेच मरायचं.

आजचं जगणं म्हणजे एक व्यसन झालंय. कशाचातरी आधार घेऊन, कशावर तरी विश्वास ठेवून, जगणे म्हणजे जगणं नाही होत.

नेमकं तुम्हाला काय म्हणायचं आहे ते सांगा.
(आमच्या पैकी एक म्हणाला)

मृत्यू... तो इसम म्हणाला...

मी समजलो नाही महाराज.. ( मी म्हणालो. )

तुम्हाला सांगण्याचे धाडस नाही, पण हे खरं आहे. जे नियती सादर करते, त्याच्या हाताखाली आम्ही पण बांधले गेलो आहोत. संसाररुपी वास्तव्य इतके विशाल आहे, की निरंकार वास्तव्य त्यात लोप पावले

आहे. अट्टहास हाच असतो की कुणीतरी त्याच्या हाताखाली येणार असते. ती एक वेळ असते जी वाईट असते, घातक असते, कारण तिलाही मर्यादा असतात आणि अस्तित्व पण असते. ज्याच्या नावाने ते कोरलेले असते त्याचा अंत हा होणारच.

चला रे... या म्हाताऱ्याला वेड लागलंय, कोणत्या जमान्यात कुठल्या गोष्टी करत आहे? (सदू म्हणाला)

बाळा आता तु नुसता ऐकत आहेस? पण जेव्हा तु या गोष्टींना समोर जाशील ना, तेव्हा तुला कळेल की मृत्यू काय असते ते?

जेव्हा येईल ना तेव्हा बघू, ए चला रे... आणि तो सगळयांना घेवून जाऊ लागला.. पण जातांना त्याने एक थैली माझ्या हातात दिली... मला घ्यायची तर नव्हती पण.. महाराजांनी आग्रह केला. ठेव बाळा समोर तुझ्या कामी येईल. पण एक लक्षात ठेव. नियती आहे, तिला कोणी बदलू शकत नाही, मी पण नाही. तरी जे मी करु शकतो ते या थैलीत मी तुझ्यासाठी दिले आहे. बाकी सर्व त्या विधात्याच्या मनात काय आहे तोच जाणे. बम भोले म्हणून त्यांनी जयघोष केला. पण मला एक आश्चर्य वाटलं की मी तिथून नजरे आड होतपर्यंत ते माझ्याकडेच बघत होते.

मित्र त्यांच्या बद्दल बोलत होते. ऐ खरंच असं होईल का? तो इसम खरं बोलत असेल का? खरंच काळ आपल्या मागे लागलाय का? पण असं कधी होतंय का? मृत्यू असा सांगून येतो काय? . आणि तो इसम असा रस्त्याच्या कडेला बसून आपल्या मनात भीती निर्माण करण्यासाठी बोलला असेल. जेणेकरुन नंतर आम्ही त्याला यावर उपाय विचारू आणि मग तो काही चुकीची कारणे देवून आपला स्वार्थ साधण्यासाठी आमचा वापर करणार. सोडा रे जास्त काही टेन्शन नको घ्या. सदू म्हणाला... काही होणार नाही झोपा आता सर्व.

पण माझ्या मनात एक वेगळीच आशंका निर्माण झाली होती. राहून राहून नको ते विचार येत होते. एकदा विचार आला की एकदा त्या थैलीत काय आहे ते बघावे? आणि माझ्या असं काय कामात येणार होते ते. तशी ती थैली हलकेच वाटली मला, मग असं काय विशेष असेल तिच्यात...

तेवढ्यात सद्या मला म्हणाला... ओ साहेब आता तुम्ही पण झोपा. जास्त विचार नका करु, नाहीतर तुला रातभर झोप नाही लागेल. त्या इसमाच्या बोलण्यावर विश्वास ठेवशील तर. आणि हसु लागला.

पण सगळ्यात आधी मृत्यूने त्यालाच गिळले.

काय बोलतोस? केव्हा आणि कसं झालं? (आता मात्र ती आणि मित्रसुद्धा गंभीर झाला. ऐकताबरोबर सर्वांना विजेचा झटका लागल्या सारखे त्यांचे तोंड पडले होते. )

" हो हे खरं आहे... मला खंत वाटते की मी त्याला वाचवू नाही शकलो. एका रात्री सुमारे १२ वाजता त्याचा मला फोन आला. तो खूप घाबरलेला होता.

ऐ यार पवन... लवकर माझ्या घरी ये ना मला खूप भीती वाटते रे...

काय झालं रे...?

अरे यार मला खूप चित्रविचित्र आकृत्या दिसतात. रात्र झाली की वेगवेगळया दिशेनी मला भयानक आवाज येतात. कुत्री माझ्या घरा जवळ जोरजोरात विव्हळत असतात. कुणीतरी रात्री माझे हात घट्ट पकडून ठेवल्याचं मला जाणवते. आणि माझा गळा दाबत आहे असं वाटते. मला रोज चाबकाचे फटके मारत असतात. गेल्या काही

दिवसापासून हे असच चालू आहे. मला असं वाटतं आहे माझा मृत्यू जवळ आला आहे. आत्ताच मी पुन्हा झोपेतून उठलो आहे. तु ये ना प्लीज...

अरे वेड्या काही होणार नाही तुला. त्या इसमाचं बोलणं मनावर घेतले असेल तु, ते मनात ठेवलं असेल आणि भुतांची सिनेमा पण तु खुप बघतो. पाणी पी आणि झोपून जा...

अरे नाही यार मी खरचं सांगतोय. एक प्रचंड मोठा व्यक्ती, रेड्या वर बसून मला आपल्या सोबत नेण्यासाठी प्रयत्न करतो. मला चाबूक मारतो. आणि खूप जोरजोरात हसत असतो. तेवढ्यात मला जाग येते.

अरे वेड्या स्वप्न म्हणजे एक आभास असते. आपण झोपताना ज्या गोष्टींचा विचार करता करता अर्धवट सोडून देतो. ती गोष्ट आपली बुद्धी त्या कल्पनेत आपल्याला रंगवते. ज्यामुळे स्वप्नांची निर्मिती आपल्याला माहिती होते. पण मुळात तसलं काहीही नाही. तू झोप मी उद्या येतो तुला भेटायला.

मग काय काय झालं? तू गेलास का त्याला भेटायला...

हो गेलो होतो... खरी जाणीव मला तिथूनच कळली होती, कारण ज्या दिवशी मी सद्याला बघितलं. त्यादिवशी तो त्रासला होता. एखादा वाघ आपल्या सावजाला खेळून खेळून मारत आहे, अशी त्याची अवस्था झाली होती. कारण आत्ताच सांगितलेलं स्वप्न हे एक आभास असते. असं मी म्हटलं होतं. पण स्वप्नात होणारे चाबकाचे वार त्याला प्रत्यक्षात मिळत होते आणि तेही त्याला अंथरुणावर प्रत्यक्षात.

मग समोर... पवन..

आणि त्याच रात्री सद्या मला सोडून गेला.

ठरल्याप्रमाणे स्वप्निल आभासात मी बाजूच्याच बेडवर झोपून होतो. त्याच्याकडे बघितल्यावर असं वाटत होतं, की कोणीतरी त्याच्या छातीवर बसून त्याची नरडी दाबण्याचा प्रयत्न करत आहे. पण असं काहीच दिसायला येत नव्हतं सद्या मात्र ओरडत होता, पवन वाचव... मला... पवन वाचव... हा बघ... बसलाय... उरावर.

तो कळवळत होता, आणि मी बाजूला राहून फक्त बघत होतो. कारण काय करावं? आणि काय नको? हे मला पण सुचत नव्हते. शेवटी सद्याने श्वास सोडले. मी त्याच्या लॅब रिपोर्ट सुद्धा बघितले, पण मला हवा तसा काहीच पुरावा मिळाला नाही. त्याचं मृत्यू हे सगळं नॉर्मल

पद्धतीने झालं आहे असंच प्रूव झालं. पण तेव्हाही माझ्या डोक्यात नाही आलं की हे सगळं काय चालू आहे?

हे सगळे योगायोगही होऊ शकते पवन... त्यात इतकी चिंता करण्याचा काहीही प्रश्न उद्भवत नाही. कारण काहीवेळा माणसाचं भीतीने शरीरावरचं नियंत्रण सुटून जातं आणि एखाद्या वेड्यासारखा तो करू लागतो, हे असेही काही प्रकरण होऊ शकते.

योगायोग एकदा होते रितू, पण येथे तिघेजण आहे जे मृत्यूच्या आहारी गेलेत. आणि त्यात सगळ्यात आधी जाणारा सदू होता. सद्याच्या मयतीसाठी जेव्हा आम्ही सगळे जमा झालो. तेव्हा मी कित्येकांना ते सांगण्याचा प्रयत्न केला. पण कोणी माझं ऐकलं नाही. उलट मला वेड्यात काढून निघून गेले.

त्यानंतर अमर गेला, प्रदीप गेला, आणि एक म्हणजे ज्या पद्धतीने सद्या मरण पावला होता, अगदी त्याच पद्धतीने त्या दोघांना पण मृत्यूने नेले होते. तेच शोपनिक भास आणि तेच क्रुर हास्य... आणि तो चाबकाचा फटका... आता फक्त आम्ही दोघेच उरलोत रितू. आता तूच सांग कसं काय करावं मी? ज्या अर्थी मी त्यांना वाचवू शकलो नाही... तर तुला काय वाटतं? मी स्वतःला वाचवू शकेन काय? आणि आणि

इतकं सगळं मला माहित असताना मी तुझ्याशी एकरुप व्हायचा कसा प्रयत्न करायचा. हे स्वार्थ झालं, आणि मला नाही करायचं हे.

हे बघ रितू तू समजूतदार आहेस. शिवाय सुसंस्कृत आणि सुस्वभावी आहेस. जर मी तुझा नाही झालो तरी तुझं काही कमी होणार नाही. उलट मी तुला एक नवीन जीवन देतोय असं समजून तू लग्न कर. मला विसरून जा, कारण मला माझे उरलेले आयुष्य असं कोणावर झोकून जायचं नाही आहे. जे झालं ते माझ्यासाठी कमी नाही आणि मी ते टाळूही शकत नाही.

मला मान्य आहे पवन, तू ते टाळू शकत नाहीस. पण मला असं सोडून जाऊ नकोस, कारण मला तू हवा आहेस. कारण जितकं तू भोगलं आहेस ना, चार वर्ष मी पण माझ्या प्रेमाला तुटताना इतक्या जवळून बघितलं आहे. चार वर्षे तुझ्या विरहाचं दुःख मी पण सोसलं आहे. आता शेवटी मरणाला तरी मला अलग नको करू.

नाईलाज आहे रितू... आणि प्लीज तुला माझी शपथ आहे, मी आहे तसा असू दे मला. अजून कोणाला हरवण्याची ताकद उरली नाही माझ्यात... सगळ्यात आधी मला नमनचा शोध घ्यायचा आहे. कारण तो कुठे गेला आहे, मला माहिती नाही. तो सद्याच्या मयतीला आलेला

होता. त्यानंतर फक्त फोनवरच त्याची माझी बोलणी व्हायची. पण हल्ली त्याचा नंबर पण लागत नाही आहे.

मला निघायला हवं रितू... मी फार काळ नाही राहू शकणार... ही नियती आहे... आणि तुलाही तसंच वागावं लागणार... ती रडत होती आणि मी निघून चालला गेलो.

आयुष्यात माझ्यासाठी दुसऱ्यांदा ती रडत होती. पहिल्यांदा मी तिला सोडून जाताना, आणि आता परत तिला सोडताना. खरं तर मी पेरजागडावर नमनचा शोध घेण्यासाठी गेलो होतो, कारण त्याच्या मित्राकडून मला कळलं होतं की यंदा त्याचा गडावर फिरायला जायचा प्लान ठरला आहे म्हणून. पण शिवाय नमनला सोडून परत एकदा माझी आणि रितुची भेट झाली.

## ४) पवनला हॉस्पिटलला नेणे...

गडाच्या पायथ्याशी एक मंदिर बसलं आहे. कालांतराने गड जेव्हा फॉरेस्टच्या हद्दीमध्ये गेलं, तेव्हा खाली असलेली दोन ते तीन एकर तेवढीच जागा फक्त देवस्थानच्या नावे राहिली. आणि तिथे रखवालदार फक्त एक माणूस राहतो. सकाळी रोजच्यासारखा तो जेव्हा झोपून उठला, तेव्हा रोजच्याप्रमाणे त्याने फेरफटका मारण्यास सुरुवात केली.

अचानक गडाच्या प्रवेशद्वारापाशी, त्याला मी निपचित पडलेला आढळून आलो. तो घाबरत घाबरत माझ्यापाशी आला. डोक्यातून आणि गुडघ्यातून घरंगळत आल्यामुळे थोडेफार रक्तसंचार होऊ लागले होते. आधी त्याने मला पालथ्या पडलेल्या स्थितीतून सरळ केले. आणि मी जिवंत आहे की मेलो आहे याची जाणीव केली. अत्यंत कमी प्रमाणात माझा श्वासोच्छवास चालू होता. त्यामुळे त्याला जरा हायसे वाटले. आणि त्याने उचलून मला त्याच्या खोलीत नेले. थंड पाण्याचे शिंतोळे चेहऱ्यावर मारले.

पण माझ्यात इतकी शुद्ध पण नव्हती की त्याच्या पाण्याच्या शिंतोड्याने मला जाग यावी. कारण माझं शरीर फक्त तिथे पडलं होतं. आत्मा अजूनही तिथेच संचारत होती. जिथून मी निघालो होतो. मी

अजूनही त्याच दरीतून चालत होतो. ज्या रस्त्यासाठी मी तिथे गेलो होतो. ते रस्तेही आज माझं निराकार रूप बघत होतं.

मंदिरात असणाऱ्या त्या माणसाने, गावात फोन करून माझं एक अज्ञात शव म्हणून माझी नोंद केली. आणि त्याच प्रमाणे एका डॉक्टरची सुद्धा सोय करावी असं त्याचं म्हणणं फोनवर झालं. ठरल्याप्रमाणे कित्येकांच्या गाड्या आणि सायकल मला बघण्यासाठी आले. त्यापैकी एक गाडी होती काकांची. गेली कितीतरी दिवसे मी लापता आहे हे सगळ्यांना कळलं होतं. एव्हाना माझ्या नावाची रिपोर्ट पण पोलिसात तेव्हाच केली होती रितूने.

प्रत्येकाच्या घोळक्यात काकाने मला ओळखलं. आणि दुरूनच पवन म्हणून मला हाक मारली. पण मला शुद्ध होतीच कुठे? मला बघितल्यावर काकाच्या जीवात जीव आला. कित्येकांनी माझ्या मृत्यूचे फर्मान आधीच काढले होते. त्यामुळे मी जिवंत आहे ही आशा कित्येकांनी सोडून दिली होती.

गाडीवर बसवून काकाने मला घरी आणलं. घरी सगळ्यांना फोन करून माहिती दिली. रितूला वगैरे माहिती मिळाली. माहिती मिळताच रितुने हातातील काम टाकून तसेच ती माझ्याकडे धावत आली.

बाहेरच्या खोलीत काकाने अंथरूण अंथरले आणि काकूने पंखा लावला. बहिणी आसवा गाळत उराशी बसल्या होत्या.

काही वेळात दारात डॉक्टरची गाडी आली. बघ्यांची गर्दी अगदी अतोनात होती. कारण प्रत्येकाला आज माझ्या बाबतीत एक कुतूहल जाणवत होतं... डॉक्टर आले. त्यांनी हाताची नाडी बघितली. स्टेथोस्कोप लावून हृदयाची हालचाल बघितली, आणि टॉर्चने डोळे वगैरे बघितले. मी जिवंत आहे की मेलोय हे त्यांच्याही लक्षात येत नव्हते. कारण हृदय फार कमी प्रमाणात धडधड करीत होते. आणि श्वास पण नाहीच्या बरोबर चालू होते. काय उपचार करावा? हे त्यांना सुद्धा उमजत नव्हते. कारण त्यांच्याही आयुष्यात ही अशी केस पहिल्यांदाच आली होती.

काकाने जेव्हा त्यांना विचारलं की नेमकं त्याला काय झालं आहे? तर डॉक्टर काहीच सांगण्याच्या तयारीत नव्हते. तोपर्यंत रितुही येऊन पोहोचली होती. तुळशी वृंदावनापासून तिची आलेली आर्त हाक, खरंच हृदय पिळवटणारी होती. आतापर्यंत फूसफुसत असलेल्या बहिणी पुन्हा एकदा नव्यानं बांध फोडू लागल्या होत्या. ज्यात नुकतीच रितूने भर पाडली होती.

नुकतीच पोचलेली आई अजून धाय मोकलून रडू लागली. शेवटी काकाने जरा रागाने डॉक्टरला विचारले. अहो सांगाल काय? काय झालं आहे ते? . किती वेळ झालाय तुम्ही त्याला तपासलं असता...?

अहो हे माझ्या हातचं नाही. त्याचं हृदय इतकं कमी प्रमाणात धडधडत आहे की स्पंदनाचा आवाजही तितकासा येत नाही मला. आणि राहिला श्वास तो पण पूर्णपणे थांबून आहे. थोडक्यात मी तुम्हाला सांगू शकतो की तो स्मृतीमध्ये हरवलाय... कोमात गेलाय तो..

कुजबूज वाढली... रितू पण माझ्या चेहऱ्यावरून हात फिरवत ओरडायला लागली.. तू येतो म्हणालास आणि आलास... पण का तू आज इतक्या लांब गेलास रे... परत सगळे कुजबूज करू लागले. इतके दिवस आज तीन_चार महिन्यांचा कालावधी होत आहे. इतके दिवस हा होता तरी कुठे? प्रत्येकाच्या मनात हा एक कुतूहलाचा प्रश्न होता.

मग डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मला रुग्णवाहिकेत घालून हॉस्पिटलला ॲडमिट केलं होतं. सकाळीच वार्ताहरात बातमी आली, की शेवटी पवनचा शोध लागलाय... काही कालावधीनंतर त्याची बेशुद्धावस्थेत बॉडी सापडली. डॉक्टरच्या म्हणण्यानुसार तो कोमामध्ये गेलाय. एक छान पर्यटक, निसर्गाचे अध्ययन करणारे, दऱ्याखोऱ्याची

माहिती जनलोकांपर्यंत पोहोचवणारे, काही दिवसांपूर्वी त्यांची लापता होण्याची वार्ता खरंच मनात हळहळ करून गेली होती. आणि आज अचानक त्यांचा पत्ता लागला पण तेही कोमामध्ये गेलेत ही वार्ता ऐकून प्रेक्षकांमध्ये घर करून गेली होती. कित्येकांना माझ्याबाबत एक दुःख वाटत होतं.

खरंतर माझ्या जीवनशैलीमध्ये बरेच काही बदल झाले होते. शरीराने तर झालेच झाले पण ज्या विचारांनी मी एकेक पाऊल सत्वाच्या वाटेवर टाकला होता. त्याची ती अनुभूती पण तितक्याच दैवयोगाने आली होती. सायंकाळ होईपर्यंत कित्येकांचं जाणं-येणं असल्यामुळे अख्खं वार्ड आणि हॉस्पिटल फेमस झालं होतं.

सायंकाळच्या त्या एकांतात रितू माझ्या बाजूला बसली होती. कितीतरी दिवसानंतर आज तिच्या चेहऱ्यावर थोडीफार काळजी का असेना पण सुखाची एक लहर आली होती. कारण तसाही मी बेडवर असलो तरी तिच्या मनाला एक समाधान होतं. मी कुठेतरी तिच्यासोबत असण्याचा, तिचा होऊन जगण्याचा.

काही वेळात नर्स आली. ऑक्सीजन मास्क माझ्या चेहऱ्यावर लावून मशीनकडे बघत काहीतरी तिच्या नोंदवहीत नोंदवलं आणि

निघून गेली. रात्रीला थांबायला आई आली होती. आल्या-आल्या डोळ्याला पदर लावून तिने घेतला होता. माझ्या पायापाशी येऊन तिने स्वतःला नतमस्तक केले. आणि परत एकदा दूर कोपऱ्यात जाऊन पदर ओलं करायला बसली.

रितुने एकवार माझ्याकडे बघितलं आणि आईकडे निघाली... तिला येताना बघून आईने रडायचे थांबवले, आणि म्हणाली... बाळ जा आता घरी... मी थांबते पवन जवळ.

आई...

इतक्या वर्षांनंतर तो मला भेटला आहे, आणि आता इतक्या महिन्यानंतर आज माझ्याजवळ आला आहे. आणि ते वचनसुद्धा मी त्याला आधीच मागितलं होतं. इतक्यात मी काय सोसलं हे मलाच ठाऊक आहे आई. तुम्ही तर त्याची आई आहात.. तुमच्याशिवाय कोण आहे त्याच्याजवळ.. पण हे शेवटचे क्षण... द्याना मला आई... कदाचित तुमचं मातृत्व नाही देऊ शकणार त्याला... पण माझं प्रेम कधीच कमी पडू देणार नाही.

तुझ्याबद्दल खात्री आहे गं मला... पण ही वेडी ममता कधीच स्वस्थ बसू देणार नाही.. अगदी छोटासा होता तो. जेव्हा त्याची तब्येत

बरी नसायची. कधीच मला एकटे सोडून जाऊ नको म्हणायचा. साधा ताप जरी येईल तरी मला त्याच्याजवळ बसून राहावं लागायचं. म्हणायचा आई तू नसशील ना माझ्याजवळ... तर देवाला एकच प्रार्थना करीन, की मला कधीच कोणता आजार होऊ देऊ नको. आणि जर मला आजार देत असशील. तर माझ्या आईला कधीच माझ्यापासून हिरावू नको... किती कौतुक वाटायचं तेव्हा मला. आणि आज हा इतका मोठा झाला की त्याचे निर्णयसुद्धा तोच स्वतः घेतो.

आई तुम्ही जा ना हो घरी... मी आहे इथे त्याच्याजवळ, अगदी त्याची म्हणून. तुम्ही काळजी नका करू. काही लागलं तर आहे मी सांगायला. आणि कसलेही टेन्शन घेऊ नका! कुठेही जाणार नाही तो आपल्याला सोडून? जेव्हा तो बरा होईल ना त्या दिवशी हक्काने तुम्ही त्याला जाब विचारा.

ठीक आहे पोरी.. निघते मी.. डबा आणला आहे जरा जेवून घे. काळजी घे स्वतःची आणि त्याची पण (आणि परत एकदा पदर डोळ्यांना लावून घेतला. ) कासावीस झालेलं मन दरवाजाही पार करू शकत नव्हते. वारंवार नजर बेडवर लेटलेल्या माझ्या शवावर जात होती.

मित्रमंडळी, आई, शेजारी वगैरे सगळे भेटून निघून गेले होते. मी निपचित अंथरुणावर पडलो होतो. आणि रितू माझ्यापाशी राहून माझा हात तिच्या हातात घेण्याचा प्रयत्न करत होती. एक नजर माझ्याकडे आणि एक नजर मिठीत धरलेल्या तिच्या हाताकडे. क्षणभर माझ्या हातात असलेल्या अंगठी कडे तिची लक्ष गेली. आणि केव्हा ती त्या भूतकाळात शिरली तिला कळलेच नाही.

नुकताच पाऊस पडून बळीराजा सुखावला होता. उघडेबोडके असलेले डोंगर तृणपानांनी डोलावत होते. चोहोबाजुला गार गार वारे वाहू लागले होते. आणि त्यातच माझी सातपुडावर जायची ट्रीप ठरली होती. तसं तिच्यापासून दूर जाणे मला जमत नव्हते. पण निसर्गाचा नाद मला अलगद वेडा करून जातो. आणि त्यामुळे नवीन स्थळे बघणे आणि त्यांना ट्रेक करणे मला एक आव्हान असल्यासारखे वाटून जायचे.

माझ्या प्रत्येक गोष्टीची रितूला फार काळजी वाटायची. डबा वगैरे तिने बनवून दिलाच होता, पण सतत माझं तिच्यापासून दूर असणे हे तिला कधीच आवडत नव्हते. आणि हे सगळं खरंच होतं. जेव्हापासून मी तिला भेटलो होतो, सतत मी कोणत्या ना कोणत्या कामातच असायचो. प्रवासात एखाद्या स्टेशनची भेट व्हावी, अशीच भेट व्हायची आमची. तिचं नको म्हणत असताना सुद्धा माझं जाणं तिला फारच

अवघडत होतं. त्यामुळे मी आल्यावरही ती कितीतरी दिवस माझ्याशी बोलली नव्हती. पण तिला खूष करण्याच्या सगळ्या ट्रिक्स मला माहीत होत्या.

लवकरच नव्या वर्षाची एक नवीन सुरुवात होणार होती. आणि मी तिला विचारावं तर ती फक्त एकच शब्द बोलायची. तुला तर माझी काहीच चिंता नाही, जा तू फक्त आपलं जंगल फिरत बस.

तिला सरप्राईज देण्यासाठी मी मग एक प्लॅन केला. पण ती माझ्या पेक्षाही समोरची ठरली होती. मी मित्रांच्या खोट्या बहाण्याने तिला घराच्या बाहेर काढलं. अगदी किडनॅप केल्यासारखं. सुरुवातीला ती मला खूप शिव्याशाप देत राहिली पण नंतर मला बघताच चूप झाली.

गाडी बीचवर थांबताच दूर किनाऱ्यावर जाऊन बसली. माझ्याकडे न बघता दुसरीकडे तोंड फिरवून अगदी शून्यात असल्यासारखे बसली. च्यायला मुलीचा पण राग ना खरंच भारी असतं. मनात असं म्हणून मी तिचा हात धरला, तर तिने तो हात झिडकारून लावला. मी परत एकदा हात पकडला आणि प्लीज म्हटलं, तिने रागाने थोडी नजर माझ्यावर टाकली आणि हात तसाच हातात ठेवत परत दुसरीकडे नजर वळवून बसली. मी खिशातून एक डबी

काढली. ज्यात मी तिच्यासाठी एक आवडीने रिंग घेतली होती. हलकेच तिच्या हाताच्या बोटात टाकली आणि म्हटलं, आता झालीस बघ माझी हक्काची बायको, गाजवा आता तुमचे हक्क, आज वर्षाचा पहिला दिवस आपल्या लग्नाला या अथांग सागराला साक्षी मानून मी तुला माझी पत्नी मानतो... अगं आता तरी बोल.

काय बोलू... खूप ऐकतो न माझं जणू, थांबलेलाच असतो माझ्यासाठी..

हे काय आहे ना तुझ्यासाठी थांबून...

आता आहेस, पण मग गाजवतोस तू तुझे पुरुषार्थ...

ओके... आय एम सॉरी... आता ऐकणार बाबा तुझं... पण एकदा जरा गोड हस ना...

तू कधीच सुधारणार नाही. असं म्हणून तिने तिच्या कडली एक अंगठी माझ्या हाताच्या बोटात अडकवली आणि म्हणाली... शो माय डियर हसबंड... सागराच्या साक्षीने येथे लग्न लावलाय, पण घरी काय सांगणार आहेस?

अग घरच्यांना काय करतेस? ऑलरेडी तुझ्या वडिलांना सासरेबुवा मानलंच आहे. नाही म्हणाला तर पळवून नेईन हं तुला...

इतक्यात असले निर्णय नको देऊ, घरी सगळ्यांना माहीतच आहे. तू सातपुड्याला गेला असताना आई-वडिलांशी बोलले तुझे बाबा.

अच्छा... हे तर सोन्याहून पिवळे झालं...

पण एक वचन हवंय तुझ्याकडून... देशील ना...

अगं एक काय? दहा माग... आज जीव जरी का मागितला तरी देईन...

प्लीज असं नको बोलू... पण जेव्हा कधी तू मला सोडून जाशील ना, तेव्हा या अंगठीकडे बघून माझी आठवण करत जा. त्यामुळे मी अंगठी तुला देणं केली आहे.

ओके माय वाईफ... जर तुझ्या अटी पूर्ण झाल्या असतील. तर मला प्लीज तुझ्या ओठांचा स्पर्श देशील काय?

ओके माय हसबंड... शुअर..

चेहऱ्यावर एक हसू उमललं. प्रेमाचे प्रसंग किती मजेशीर असतात. माणसाचं वय निघून जातं पण प्रेम जसेच्या तसेच असते. ती विचारात बुडलेली असताना एक विचित्र असा आवाज तिला ऐकू आला. आणि ती घाबरून इकडे तिकडे बघू लागली. दरवाजा आतमधून लावलेला होता. फक्त बाजूला नर्सचं येणं-जाणं चालू होतं. नाहीतर एव्हाना पूर्ण स्टॉप शांततेत विलीन झाला होता. फक्त पंख्याचा तेवढा आवाज गुरगुर करीत होता.

पण तो विचित्र आवाज दोन-तीनदा तिच्या कानात घुमत होता. एकवार नजर तिने माझ्याकडे नेली, आणि तिला धक्काच बसला. माझ्या अंगावरचे कपडे रक्ताने माखले होते. चाबकाच्या फटक्याने माझे कपडे फाटत चालले होते. माझा श्वास जोराजोराने चालत होता. रितू हादरली होती, कारण ही परिस्थिती तिच्यासाठी काही नवीन नव्हती. याआधी मीच तिला कथन केली होती.

पवन... पवन... ती आकांततांडव करू लागली होती. धावत जाऊन तिने नर्सला बोलावून आणले. जवळपास झोपून असलेले

वार्डबाय वगैरे सगळे तिथे जमा झाले. माझा शर्ट रक्ताने लाल लाल झाला होता. वॉर्डबॉयने जेव्हा माझा शर्ट काढला तेव्हा माझ्या पाठीवर चाबकाचे फटके अगदी ताजेतवाने वाटत होते. आणि माझा श्वासोच्छवास परत एकदा फुलू लागला होता. रितू स्वतःवरच कोसळत होती, कारण तिला कळायला आलं होतं की मृत्यू आता मला न्यायला आला होता. आणि चाबकाचे फटके देऊन त्याने त्याची सुरुवात पण केली होती.

## ५)मृत्यूचे रहस्य...

जेव्हा पेरजागडच्या ट्रीपवर मला नमन मिळाला नाही. त्याची शोधमोहीम मी चालूच ठेवली होती. कारण त्यानंतर त्याचं किंवा माझं मृत्यू होणे हे अटळ होतं. कुणाला फोन लावावा? काय करावं? काहीच कळत नव्हते. जर कुणाला घरी वगैरे बोलावून त्याला सविस्तर काही सांगितलं तर तो मला खुळा समजेल असं मला वाटत होतं.

एखाद्या ढोंगी बाबा ने तुम्हाला काहीतरी सांगावं, आणि तुम्ही त्यावर विश्वास करावा. काय खेळ चाललाय काय? असे लोक म्हणायचे आम्हाला. खरंच ज्याचं जळतं त्यालाच कळतं. दिवसेंदिवस माझ्यातला उत्साह कमी होत जात होता. घरच्यांना माझ्याबाबत काळजी वाटू लागली होती.

रोजच्या दिनचर्येचा सूर्य जसा पश्चिमेला जात होता. तसतसं माझ्यातही मृत्यूचे भय उत्पन्न होऊ लागलं होतं. पण मला त्याचं भय नव्हतं, सगळ्यात आधी चिंता दाटली होती ती नमनची.

त्यादिवशी इकडेतिकडे फिरल्यावर मी असाच ताणतणावाने बसून होतो. तेव्हा रितु अचानक आत आली. क्षणभर माझं तिच्याकडे लक्ष गेलं, पण मन अजूनच बेचैन झालं. ती वेडी माझ्यासाठी जीव जुगारते आहे, आणि मी मृत्यूला भितो आहे. एक वेळ अशी होती की जिच्यासाठी जीव द्यायची सुद्धा तयारी होती माझी, आणि आज तिच्यापासून स्वतःला लपवत होतो.

पण जेव्हापासून मृत्यू आमच्या मागे लागला होता. तेव्हापासून माझ्या सगळ्या इच्छा नसल्यासारख्या झाल्या होत्या. केलेली नवीन वाटचालीची प्लॅनिंग सगळी विस्कटून गेली होती. एखाद्याच्या मागे दुर्दैव असे हात लावून मागे पडावे, आणि त्याचं नामशेष व्हावा अशी परिस्थिती माझी झाली होती. त्यामुळे कुठे जावे? आणि काय करावे? हाच प्रश्न सतत माझ्या डोक्यात चालत होता?

सगळ्या गरजा आता निरर्थक झाल्या होत्या. आता फक्त मृत्यूशी झुंज कशी द्यायची की त्यापासून कसं वाचायचं हाच माझा प्रयत्न चालू होता. एकेकरून जगण्याचा एक आटोकाट प्रयत्न चालू होता. रितू आली आणि अशी सामोरी येऊन बसली, तरी सुद्धा मला तिची जाणीव झाली नाही. कारण आता जाणीव मला फक्त मृत्यूची येत होती. शून्यात नजर गेली होती. वास्तविकतेचा तिळमात्रही अंश माझ्या

डोळ्यात दिसत नव्हता. जणू काही कपाळावर आठ्या आणून मी एक विनवणी करत आहे, अशातला भाग चालू होता.

गेले कितीतरी क्षण दोघांमधली ही निरव शांतता एक अस्तित्वाची जाण होती. पण मी त्या अस्तित्वात फक्त एक निर्जीव पुतळा होऊन बसलो होतो. त्यामुळे तिने मारलेल्या कितीतरी हाका अशा निष्फळ झाल्या होत्या. शेवटी मला गदागदा हलवलं, तेव्हा कुठे भानावर आल्यासारखा मी तिच्याकडे प्रश्नार्थक कटाक्ष टाकला.

हां... बोल रितू, कसं येणं केलंस?

जिथे आयुष्य माझं अडकलं आहे, त्याला सोडून तरी जाणार कुठे. बरं ते जाऊ दे... नमनचा शोध लागलाय का?

जर नमन चा शोध लागला असता तर मी इथे कशाला असतो गं.

मग पुढे काय ठरवलं आहे.

ठरवलंय आता.. जिथून याची सुरुवात झाली आता तिथेच जाणार. आता मला पंढरपूरला जायला हवं. कारण त्या इसमाला

शोधणं आता आवश्यक आहे. या सगळ्याची सुरुवात त्यानेच केली होती. आणि त्यांनाच माहिती आहे हे सगळं. कारण ज्या वेळेस ते आम्हाला सगळं काही सांगत होते, त्यावेळेस आमची ते ऐकण्याची तयारी नव्हती. पण त्या इसमाला सगळं माहिती आहे. मला परत एकदा जाऊन त्यांना भेटलेच पाहिजे.

अरे हा... त्या दिवशी तूच म्हणालास ना की जाताना त्याने तुला काहीतरी दिलं होतं म्हणून... त्यात का नाही बघत. होऊ शकते त्या मृत्यू प्रकरणातून काही मुक्तीचा मार्ग असेल.

अरे हो... माझ्या तर लक्षातच नाही आलं. ती थैली.. बरोबर आहे जाताना त्या इसमाने ती थैली विनवणी केल्यागत मला दिली होती. पण ती थैली (थोडा सखोल विचार करत)हा... ती थैली तर मी नमनच्या बॅग मध्ये टाकली होती. कारण जाताना आम्ही काही वस्तू घेतल्या होत्या. आणि गर्दीत त्रास होऊ नये म्हणून मी ठेव म्हटलं त्याच्याच बॅगमध्ये. पण घरी येताना मला त्याची आठवण राहिली नाही. आणि आता नमन पण कुठे आहे त्याचा पण काही पत्ता नाही. मी परत निराशेचे आव आणून दोन्ही हात डोक्यावर धरले आणि भिंतीजवळ नेऊन हलकसं आपटत म्हणालो.

हे बघ पवन... निराश नको होऊ. हे बघ निराश होऊन यातून काही ही निष्पन्न होणार नाही आहे. तू जाऊन बघ, त्या इसमाला भेटून नक्कीच काहीतरी मार्ग मिळेल.

घरी सगळ्यांना माहिती झालं होतं की मित्रांच्या अशा लागोपाठ मृत्यू झाल्यामुळे माझ्यावर नको तो न्यूनगंड आतुरलेला आहे. पण खरं कारण अजून पर्यंत मी कुणालाच सांगितलेलं नव्हतं. शिवाय रितूच्या सहज सांत्वनांचे शब्द घरी मिळायचे, पण समाधान अजून पर्यंत मिळालं नव्हतं.

थोडं फार सांत्वन होऊन रितू तिथून चालली गेली. तिला माहिती होतं माझं जेवण झालं नाही ते, म्हणून ती डबा घेऊन आली होती. आठवणीने जेवून घे हा... अशी हमी देत ती निघून गेली. थोडेफार चाललेले संभाषण परत एकदा शांततेत परिवर्तित झाले. अचानक मनात परत एकदा प्रश्नांचे काहूर माजायला लागले.

काय असेल त्या थैलीत? जे आम्हाला वाचवू शकते. पण कसं काय असेल त्या थैलीत? चूक केली मी! मला ती थैली माझ्या बॅगमध्ये ठेवायला पाहिजे होती. किंवा एकदा तरी तिला उघडून बघायला पाहिजे होतं. ज्यामुळे मला माहिती तरी झालं असतं की त्यात असं काय

महत्वाचं आहे? का त्या इसमाने मला विनवणीच्या स्वरूपात मला ती थैली दिली होती? काय असेल त्याचे रहस्य काय असेल त्याचे महत्त्व?

नमनच्या शोधाअंती एक विसरून गेलो होतो. रहस्य कधीच असं दडलं नसते. त्याचं काहीतरी मार्ग कुठे नाही कुठे नक्कीच असते. पण आपल्याला कधीच त्याची जाणीव नसते. त्या मार्गाचा शोध करण्यासाठी मी भ्रमंती करायचं ठरवलं. ज्या रहस्याशी माझं मृत्यू जोडलं होतं. असे रहस्य सृष्टीत तुडुंब भरले आहेत. पण याची कुणाला कल्पना नाहीत. निदान जाताना आपण त्याचा खुलासा करावा असं वाटायला लागलं. त्यासाठी दुसऱ्या दिवशी मी पंढरपूरला रवाना झालो. तिथे कितीतरी वेळा मी त्या इसमाला शोधण्याचा प्रयत्न केला. पण तो कुठेच मला मिळाला नाही. कित्येकाना विचारायचं सुद्धा प्रयत्न केला पण कुणीही त्यांना बघितल्याचे सांगत नव्हते.

शेवटी निराशेच्या आठ्या पकडून मी एक बस पकडली, आणि परत गावाच्या दिशेने चालू लागलो. कारण मृत्यूचे सावट आता माझ्यावर विस्तारले होते आणि क्षणाक्षणाला मला त्याची चाहूल येत होती. खिडकीवजा येणाऱ्या झुळझुळ वाऱ्यामुळे मला केव्हा झोप आली काही कळलंच नाही?

पण जेव्हा जाग आली, अधांतरी बस कुठेतरी थांबलेली होती. सायंकाळचे सात वाजले असावे. आणि जंगलात ती बस हायवे रोडवर थांबली होती. आजूबाजूच्या शीट वरचे लोक केव्हाच कंटाळून निघाले होते. काहींना तर वेळे अभावी लिफ्ट मागून मागून कायापालट केला होता स्वतःचा. आणि आम्ही फक्त आठ ते दहा प्रवासी उरलो होतो. शेवटी कंडक्टर आणि चालक बसमध्ये आले आणि म्हणाले, झालेल्या असुविधेबद्दल खरंच आम्ही दिलगीर आहोत परंतु अथक प्रयत्न करूनही काही तांत्रिक अडचणीमुळे बस काही चालू होणार नाही. आमची दुसरी बस यायला पण बराच वेळ होईल. त्यापेक्षा तुम्ही काही वाहने पकडून समोर जाऊ शकता. अन्यथा इथे थांबून वाट पाहू शकता.

नशिबाने तर दांडी मारलीच होती, मग हे प्रसंग माझ्यासाठी काही फार मोठे नव्हते. इतरांसारखे मला त्यांच्यासोबत वाद घालण्यात पण काही इंटरेस्ट नव्हता. उरलेल्या तिकिटाचे पैसे परत घेत बॅग खांद्यावर टांगली, आणि निघालो मी पायदळी चालायला. कुणीतरी मला हाका मारण्याचा प्रयत्न करत होते पण मी एकदाही मागे वळून बघितले नाही.

कुठे जायचं? कुठे थांबायचं? काहीच उत्तर नव्हतं. फक्त वाट दिसेल तिकडे चालत राहायचं. नव्हती त्या जंगलातल्या दाट दुट कारकिर्र दाट झुडपांची भीती. आणि नव्हती कुणा वाहनाने अंधारात अपघात होण्याची भीती. फक्त वाट होती, आणि मी होतो. आणि

चालणारे पाय होते. कुणाला फोन करावे? तर मोबाईल मधली चार्जिंग पण केव्हाच संपली होती.

असंच किती वेळ चालत राहिलो कुणास ठाऊक. पण रात्र आता बरीच झाली आहे याची प्रचिती तो जंगल मला देत होता. रातकिड्यांचा किर्रकिर्र आवाज कानात घुमत होता. मध्येच कुणा घुबडाचे चित्कारने ऐकायला येत होते. इतक्यात वाहनांची ये-जा पण कमी झाली होती. ज्यामुळे समोरचं फार प्रमाणात दिसेनासं झालं होतं. चालताना अलगद काट्यांची किंवा दगडांची ठोकर लागत होती.

रात्र किती झाली होती हे मला इतकं माहिती नव्हतं. पण बराच वेळ झाल्यामुळे पाय पण आता दुखायला लागले होते. भर रात्री सुद्धा चेहऱ्यावर ओथंबून घाम फुटलेला होता. थोडसं थांबावं म्हणून रस्त्याच्या कडेला मी बसण्यासाठी जागा बघू लागलो.

थोडावेळ शांततेचं प्रतीक असं जंगलात खुलत होतं. शहरातल्या वर्दळीपेक्ष ा जंगलातच राहणे म्हणजे किती एकांतवास आहे. मला तर नेहमीच जंगलात राहिलेलं आवडत असे. आणि आयुष्यात जंगलातच घर बांधून राहायचे होते. दूर एकांतात वर्दळ नसलेली ती नितळ शांतता बघून मला फार बरे वाटायला लागले होते. पण

आयुष्याची दुःख लक्षात येताच चेहऱ्यावरचे हसू विलक्षण रूपात पालटले आणि परत चेहऱ्यावर गंभीर रूप आले. मृत्यूचे सावट सांगू लागले होते, आता आयुष्ूय नाही तुझ्याकडे...

मी जरा विसावून बसलोच होतो की, अचानक खण खण असा आवाज तीव्रगतीने येऊ लागला. मी इकडे तिकडे बघू लागलो. आकाशाकडे बघितलं तर, पूर्ण आकाश काळकुट्ट दिसत होतं. आज अमावस्येची रात्र आहे ही मला ओळखली. अमावस्येला तर भूतप्रेताचे राज्य असतं आणि निर्जन स्थळी जाऊन ते कसले कसले विद्रोह करतात हे फार आधीच मी गावाकडच्या लोकांकडून ऐकलं होतं.

आणि त्या दाट अंधारामुळे मला जंगलातलं काहीच दिसत नव्हतं. फक्त तो आवाज मात्र तीव्रगतीने स्पष्ट असा येत होता. एखाद्याने नाण्याची थैली बांधावी आणि ती जमिनीवर आपटावी, आणि त्यातून जो नाण्यांचा आवाज उद्गार उद्भवतो तसा आवाज तो कानाशी गुंजत होता. पण आवाजाच्या दिशेने बघावं तर फक्त काळोख दिसत होता. मात्र असा आवाज हा माझ्यासाठी फार अपरिचित होता. ज्याची उत्सुकता मला न राहवून त्या आवाजाकडे जाण्याची इच्छा प्रकट करत होता. शिवाय जगण्यातला माझा सगळा इंटरेस्ट संपून गेला होता. त्यामुळे जर मृत्यूच आहे नशिबात, तर ते कुठेही येईल? त्यात हा आवाज कशाचा आहे हे बघणे बरे नव्हे का?

मी हायवेवरुन खाली उतरलो. झुडूपातून कुठे जायचे आहे काहीच कळत नव्हते. आणि जंगलात असलेल्या शांततेमुळे तो आवाज जवळपासचा नव्हताच हे केव्हाच गृहीत धरलं होतं. हाताने चाचपडत झावळ्यापासून वाकत मी जंगलाच्या आत प्रवेश केला. कितीतरी अंतर पार केल्यावर मला एक पायवाटेसारखा रस्ता मिळाला. ज्याच्या आधारे मी त्या आवाजाच्या दिशेने जाऊ लागलो. आता तो आवाज स्पष्ट असा कानाशी येऊ लागला होता. कोणीतरी गाडीत भरलेलं नाण ओढून राहिलं त्याप्रमाणे मला आवाज येऊ लागला होता. आणि मी पुन्हा पुन्हा उत्सुकतेने त्यावरच्या दिशेने जाऊ लागलो.

इतक्यात मी आधाराने, ज्या झाडाला टेकून बसलो होतो. त्या झाडावर एक घुबड येऊन बसला. त्याचे ते भयानक चित्कार मला घाबरवत होते. पण मी त्याला अव्हेरून समोर समोर जातच होतो. ज्यामुळे मी कुठून आलोय? कुठे निघत आहे? काहीच कळत नव्हते. चारी बाजूला अंधाराने मेळ घातला होता. जंगल दाट होता आणि उत्सुकतेने त्यात घुसलेला एक मी.

आपण आता आवाजाच्या दिशेने जवळच आलोय असं वाटत होतं. कारण समोरून कोणीतरी लाल रंगाचं कंदील घेऊन, त्याला बंद चालू करीत येत होतं. कंदिलाचा प्रकाशझोत, विद्युत बटण बंद चालू केल्यासारखी बंद चालू व्हायची. ज्यामुळे लालसर अंधुकसा प्रकाश

आजूबाजूला पसरायचा. पण आवाजावरून असं वाटत होतं की तो बंद चालू असणारा कंदील कोणीतरी तोंडात धरून सरपटत येत होता. आणि मागे नाणी भरलेली गाडी ती खण खण आवाज करीत होती.

ते सगळं माझ्यापासून फक्त काही अंतरावर होतं, मी दिसू नये म्हणून एका डेरेदार वृक्षाच्या मागून ते बघत होतो. पण मघाचा तो घुबड त्याही झाडावर आला, आणि नको ते भयानक चित्कार करू लागला. त्यामुळे मी तिथून बाजूला असलेल्या, दाट झाडीत जाण्याचा प्रयत्न करीत होतो. आणि तितक्यात कंदील धरून सरपटणारे ते जे काही होतं, अगदी माझ्या सामोरे आलं होतं.

अचानक पायाखाली एक कुजलेली काटकी आली. ज्यामुळे कट्ट... असा आवाज माझ्यासमोर असलेल्या त्या विचित्र प्राण्याला ऐकू गेला. तत्क्षणी डोळ्यात लाल लाल निखारे पेटत असलेला एक साप फुस्स करून माझ्यासमोर उभा झाला. त्या उजेडात मी जे काही बघितलं, खरंतर ते आवाक्याच्या बाहेर होतं. जगात असलेला किंग कोब्रा त्याच्यासमोर किती तरी छोटा असेल, तेव्हा हे माझ्या लक्षात आलं.

त्याचं ते फुत्कारणे अगदी कानात गुंजत होतं माझ्या. त्याची ती केसाळ त्वचा आणि अजगरापेक्ष ा असलेले त्याचे विचित्र रूप आणि त्याने जो फणा उगारला होता, तोच फणाच माझ्या दुप्पट होता. आणि त्याचं ते फुस्स करून माझ्या पुढ्यात उभं राहणं हृदयात एक धस्स करून गेलं होतं. आणि केव्हा मी बेशुद्ध पडलो मला काही समजलंच नाही.

माझ्या बघण्यातली ती एक विचित्र बाब होती. जी कल्पना नव्हती. उघड्या डोळ्याने बघितलेले एक प्रात्यक्षिक होतं. त्याची पूर्ती माझ्या जीवनात काय स्थान देते हे मलाही माहीत नव्हते. पण माझ्या रस्त्यांची सुरुवात इथूनच झाली होती, आणि वास्तविक हा नाग म्हणजे माझी पहिली पायरी होती.

अस्तित्वाचे खरे रूप काय? तर हे त्याच्या दिसण्यावर असते. तसेच सत्वासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत आणि त्या उघड्या डोळ्यांनी सुद्धा आपल्याला दिसत नाही. त्याचे कारण तर अनेक आहे. पण न दिसणाऱ्या अस्तित्वावर विश्वास तरी कोण ठेवणार? हा प्रश्न उद्भवत असतो. आणि त्यामुळेच जर-तर चा संदर्भ होऊन वाद-विवाद चालतात.

## ६)साधू महाराजांशी भेट...

मला जाग आली तेव्हा मी जंगलात नव्हतो. बदामाच्या झाडाखाली एका चारपायी वर लेटलेलं स्वतःला बघितलं. आजूबाजूला बघितलं तर दोन-तीन झोपड्या होत्या. मोहक फुलांचे बाग सजल्याप्रमाणे जिकडेतिकडे फुलांची झाडे होती. समोर काही अंतरावर पटांगणात कबुतरे दाणे टिपत होती. आणि त्या कबुतरासोबतच इतर पक्षी पण प्रेमाने बागडत होते. किती सुंदर वातावरण होतं तिथलं. इथे भेदभाव नव्हता, गर्दी नव्हती, अहंकार नव्हता आणि मुख्य म्हणजे तिथली वस्तुस्थिती अगम्य होती, प्रेक्षणीय होती.

सूर्य जरा बराच डोक्यावर आला होता. मी किती वेळ झोपून होतो याचे मला भान नव्हते, आणि मघापासून झोपूनच मी इकडे तिकडे बघत होतो. किती वेळ झाला? असे म्हणत मी उठायचा प्रयत्न केला, आणि सहज हात डोक्यावर गेला. डोक्याला पट्टी बांधलेली होती. त्यामुळे मी थोडं कन्हनतच त्या चारपाईवर उठून बसलो. समोर बघितलं तर एक वृद्ध साधू माझ्याकडे येतांना दिसले.

भगवा वस्त्र परिधान केलेले. त्यांनी दोन्ही हाताच्या दंडांना रुद्राक्षाच्या माळा लपेटलेल्या होत्या. व्यवस्थित केसांची बांधन केली होती. पांढरीशुभ्र दाढी ऊनाच्या सूर्यप्रकाशात छान चमकून दिसत होती. चेहऱ्यावर एक विलक्षण तेज होतं. ओठावर स्मित पसरले होते. स्नेह, माया, ममता त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होती. सत्य म्हणजे काय? हे त्यांच्याकडे बघून कळत होतं. जवळ येताच काळजीने विचारलेला पहिलाच प्रश्न.

बाळ... कसा आहेस आता? कशी वाटते प्रकृती तुझी?

मी मानेनेच होकार दिला...

भूक लागली असेल ना... ही काही फळे आहेत ती खाऊन घे. आणि थोडा आराम कर, त्यानंतर आपण सविस्तर बोलू. आणि ते परत निघायला लागले.

मी कुठे आहे? कुणी आणले मला इथे?

सर्व कळेल बाळ तुला... आधी फराळ घे, आणि मग आराम कर. मग संवाद करूयात आपण.

किती आपुलकी आणि काळजी होती त्यांच्या शब्दांत. खरंतर हे एकूणच मला इतकं समाधान लाभलं होतं. की गेल्या दिवसात काय घडलं आणि माझ्या मागे काय लागलंय? हे सुद्धा क्षणभरासाठी मी विसरूनच गेलो होतो. जाताना परत एकदा त्यांचं प्रसन्न हास्य मनाला एक वेगळीच आठवण देऊन गेलं.

थोडाफार फराळ केल्यावर मला ताजेतवाने झाल्यासारखं वाटत होतं. त्यामुळे मी थोडाफार फिरायचा प्रयत्न करू लागलो होतो. त्या सुंदर अशा वातावरणाचा मला मोह लागल्यासारखा होता. तिथून जायचं आहे हा विचारच मनात येत नव्हता. न जाणे किती वेळ मी, कुठे आहे म्हणून बॅगेत पडलेला मोबाईल काढला. उरलीसुरली चार्जिंग जमा झाली का ती बघू लागलो. पण मोबाईल पण चालू व्हायचा नाव घेत नव्हता. दुपारच्या सूर्यप्रकाशाचे निखर सूर्यास्त बऱ्याच चांगल्या प्रमाणात दिसत होते. आणि त्याच वेळेस चेहऱ्यावर एक स्मितहास्य घेत परत ते साधुमहाराज माझ्या जवळ आले.

क्षणभर मी त्यांच्याकडे बघतच राहिलो. साधुमहाराज आले, आणि बाजूला एक वारुळासारखा दिसणारा मातीचा उंचवटा होता. त्यावर जाऊन बसले. मी त्यांच्या डोळ्यात बघितलं. मला कसलीच

मोहमाया त्यांच्या नजरेत दिसली नव्हती. त्यांच्या त्या निर्मळ चेहऱ्यावर, फक्त ते खऱ्या प्रकारचे स्वच्छ स्मित ओघळत होते. त्यांच्याकडे बघितल्यावर मला सगळं विसरून, स्वच्छंद विहार करणाऱ्या पक्षाप्रमाणे वाटत होतं. पण शेवटी घडलेला काळ, आणि झालेले प्रकरण वास्तविकता बदलू शकत नव्हते.

नजरेत अधाशी एक झाक आली, आणि मित्रासोबत असलेल्या त्या भेटी डोळ्यासमोरून तरुन गेल्या. आणि नकळत दोन्ही डोळ्यातून अश्रू ओघळायला लागले. शेवटी मी खाली मान घातली. अस्वस्थ झालेलं मन महाराजांशी बोलण्याची सलगी करत नव्हतं. रडलेले डोळे त्यांच्याकडे नजर वळवत नव्हते त्यामुळे मी उठून उभा झालो. महाराजांनी मला अचूक ओळखलं आणि म्हणाले...

बस बाळा... उगाच मनाची घालमेल करू नको... ही तर सुरुवात आहे, आयुष्याची तुझ्या...

शेवट आहे महाराज... शेवट आहे... आणि जर असे जगणे असेल... भीतभीत... तर मला मृत्यू केव्हाही बरे...

आयुष्याच्या तिटकारा प्रत्येकाला सहन करावा लागतो. मान्य आहे मृत्यू म्हणजे या जगातला सगळ्यात मोठा सुख आहे. पण नियतीलाही उतारचढाव असणे गरजेचे आहे, तुला मृत्यू नकोय... हेच ना...

मी असं म्हणणार नाही, कारण प्रत्येकाच्या बाबतीत ते असते. पण इतक्यात काय पाप केलं आम्ही? इतर जगतात तसेच आम्ही पण जगलो... काही आमची चूक आहे असं ठरवलं पण नव्हतं की देवाच्या द्वारी जातानासुद्धा आम्हाला शेवटचे बोलावणे होईल. (आणि मी परत रडायला लागलो)

शांत बाळा शांत... कारण जे घडत आहे, ते तुझ्या बाबतीत फार भयंकर आहे. तुमच्या बाबतीत म्हणजे, जेव्हा मृत्यू तुमच्या मागे लागला होता, तेव्हाच त्याचे समाधान तुझ्या हातात आलं होतं. पण इतरांनी केलेल्या निष्काळजीपणाने तुही त्यात हरवला आहेस. तुला पण ते सगळं खोटं वाटायला लागलं होतं...

मला झालेल्या गोष्टीबद्दल काही माहिती नाही, पण रात्रीचे जे जंगलात बघितलं ते काय होतं... लाल रंगाचे निखारे घेऊन एक भुजंग

शेपटीला काहीतरी बांधून निघालेला होता. आजपर्यंत असली विचित्र गोष्ट, मी ऐकली तर नव्हतीच पण कधी बघितली पण नव्हती...

बाळ...

जगात अशा कित्येक जागी सत्वाचं धारण बसलंय. आणि तुमच्या चालू असलेल्या जडणघडणामुळे, आता ते सत्त्व लुप्त पद्धतीने वास करते. काल रात्री ज्याची तुला प्रचिती आली ते त्याचंच एक उदाहरण आहे.

म्हणजे ते नेमकं म्हणजे काय आहे?

कितीतरी वर्षांपूर्वीचा इतिहास आहे तो. तो एक श्राप होता, आणि त्यामुळे सोने चांदीची नाणी, व्यवहारातून डांबण्यात गेली, अधिकाराची अंमल कुणाचीच नसायची. साठवलेला पैसा तो शापित व्हायचा. आजही पैशांसाठी लोकांची काय प्रतिक्रिया असते? हे तुला माझ्यापेक्षाही फार चांगल्या पद्धतीने माहिती आहे. त्या काळात भीषण घनघोर युद्ध व्हायचे. जितकं अफाट द्रव्य असायचं, तितकीच भीती असायची. माणसे संपत आली, युग बदलत आलं, पण तो श्राप आजही जिवंत आहे. जगात कित्येक ठिकाणी तो द्रव्यसाठा असा भूमातेच्या गर्भात सुरक्षित आहे.

कित्येक जादूगर, कित्येक चेटक, त्या पैशाच्या आधारावर श्रीमंत होण्याची स्वप्न बघतात, आणि प्राणाला मुकतात. त्यामुळे जसे तुमचे नियम बदलतात, तसेच या सृष्टीचे नियम बदलतात. सत्व अजरामर असायचं ते लुप्त व्हायला लागलं. जसं आधी देव माणसात असायचा आता फक्त विश्वासात असतो. आणि आता तर त्यालाही चमत्कार हवा असतो. स्वतःचं अस्तित्व जपायला.

पण मग इतका द्रव्यसाठा... भूमातेच्या गर्भात राहून, त्याचा वास्तविकतेसाठी का उपयोग होत नाही? आणि त्याचं संरक्षण हे कोण करतो? कारण त्या एका साठ्याने अनेकांच्या पिढ्या संपतील तरी तो साठा संपणार नाही.

जसा तुमच्या नियोजनानुसार तुम्हाला जितकी आमदनी मिळते. तसच सृष्टीचा नियम आहे, तिच्या उदरात जितक्या सजीवांचे नियोजन होते. तितकीच ती बहरते, कोपते. तुम्ही कितीही चंद्रावर गेले, किंवा कितीही डोकं लावलं. तरी तुम्ही सृष्टीचेच एक भाग आहात. इथे प्रत्येकाला ज्याची त्याची जबाबदारी त्याला दिली आहे. आकाशात पक्षी विहार करतात, झाडे पृथ्वीला सौरक्षण करतात. त्याच प्रकारे या

द्रव्यसाठयालाही कोणी जबाबदार असतो. त्याची देखरेख करणे, किंवा त्यापासून सुटका करणे हे सगळं त्याच्याच हाती असते.

म्हणजे काल असलेला तो भुजंग!!!

हो...

त्या साठ्यावरचा तो रक्षक होता. आणि जितके वर्ष, काळ तो त्याच संरक्षण करतो. तितकाच तो मोठा होत जातो, केसाळत जातो. जोपर्यंत त्याला त्या जीवनापासून मुक्ती मिळत नाही, तोपर्यंत त्याचं जीवन असंच चालत असतं.

दर अमावस्येला त्याची प्रभात फेरी निघते. अंधाराच्या साम्राज्याला लाल रंग हा निडर असतो. त्या टिकमिक होणाऱ्या प्रकाशावर आलेला जनावर, तोच त्याचा भक्ष्य असतो. आणि जे काही द्रव्यसाठा आहे त्याचा ध्वनी त्याच्या मागे असतो. पण हा द्रव्यसाठा आणि संरक्षक असं प्रत्येकाला दिसत नाही. तो त्यालाच दिसतो ज्याच्याकडून त्याला काही अपेक्षा आहेत, किंवा ज्याला त्याबद्दल कसलाही मोह नाही.

पण जर का त्यांना काही हवे असेल, तर मग ते असं मागू शकतात ना...

तुझे म्हणणे रास्त आहे. पण कसं आहे? जितकी जास्त संपत्ती तितकीच जास्त चिंता, जितकी जास्त शक्ती तितकीच जास्त जबाबदारी. जसे एखाद्या जिन्नला बांधून ठेवले होते, कारण त्याच्यात संपूर्ण सृष्टी पालटून टाकण्याची शक्ती होती. ज्यामुळे तो चांगला आहे, असं माहीत झालं असलं, तरी त्याची शक्ती अशी नजरेच्या आड घेण्यात आली नसती. त्याचप्रमाणे हा भुजंग आहे. तुमच्या विज्ञानाच्या मध्ये सापाचं आयुष्‍्य शंभर वर्षे म्हणजे खूप होतं. पण अजूनही असे काही साप आहेत, जे कितीतरी वर्ष जगू शकतात. ज्यांना अद्वितीय शक्तीचं वास आहे.

गेली कितीतरी वर्षे हा साप फिरतो आहे. कितीतरी जागा त्याने बघितल्या आहेत, आणि कदाचित मृत्यूचे खरे कारण, तुझ्यासाठी त्याच्याकडूनच मिळेल. ज्याच्याकडे ती थैली आहे. सगळयात आधी तू ती थैली मिळव. कारण त्या थैलीशिवाय तुला काहीच करता येणार नाही.

पण ती तर माझ्या मित्राकडे आहे. गेले कित्येक दिवस मी त्याच्या शोधार्थ आहे. पण तो मला भेटतच नाही आहे. या चार वर्षात मी माझ्या मित्रांना हरवले आहे, आता त्याला नाही हरवू शकत, पण तो कुठे गेलाय? मला काहीही माहिती नाही.

तुझ्याकडे वेळ फार कमी आहे, तू जितकं जास्त वेळ घेशील, तितकंच तोही तुझ्यापासून दुरावत जाईल. पण लवकरच त्याची आणि तुझी भेट होईल.

मग मला नेमकं करायचं तरी काय आहे?

तुला काय करायचं आहे? हे त्या थैलीत सर्वच दिलं आहे, आणि ज्याने तुला ती थैली दिली, आणि सगळयांना आव्हान केलं. तो माझा शिष्य गंगाधर आहे. तो तुला मिळेलच. काल त्यानेच तुला येथे आणले, जेव्हा तू भुजंगाला बघून बेशुद्ध पडला होतास.

महाराजांनी अशा बऱ्याच गोष्टी मला पटवून सांगितले. पण मृत्यू का आमच्या मागे लागला? माझा आणि त्या भुजंगाचा काय संबंध होता? नियती माझ्याकडून आणखी काय घडव ू इच्छित होती? प्रश्नांचा भडिमार माझ्यावर होऊ लागला होता. शेवटी त्यांनी

सांगितलेलं सगळं लक्षात घेऊन, मी त्यांच्या पाया पडलो. आणि मला निघायला हवं असं म्हणालो.

काही वेळाने मला जाग आली. मी अजूनही दाटलेल्या त्याच जंगलात होतो. बघितलं तर रात्री घडलेल्या त्या प्रसंगाचा, काहीही लवलेश तिथे नव्हता. कुठे सरपटण्याची खूण नव्हती, की कुठे पायवाट पण नव्हती. पण कुठेतरी कुबट असा वास मात्र नाकाला येत होता.

जिथून ती दुर्गंधी येत होती. तिकडे जाण्याचा प्रयत्न करत होतो. अचानक लक्षात आलं, डोक्यावरची जखम केव्हाच नाहीशी झाली होती. साधू महाराजांनी सांगितल्यानुसार त्यांनी त्यांचं अस्तित्व कायम केलं होतं. एखाद्या स्वप्नील भासातून जागल्यासारखे त्यांनी मला इथे जंगलात आणून सोडले होते. अगदी त्याच ठिकाणी जिथून माझी नवीन सुरुवात झाली होती.

थोडावेळ समोर जाताना झाडीत एक वाघ बसून असलेला मला आढळला. पण आता त्याला बघून मला भीती वाटत नव्हती. मला पाहून त्याचे गुरगुरणे मात्र वाढलं होतं. कारण सहाजिकच आहे मी त्याच्या घरात होतो. परतीचे पाऊल टाकावे तर त्याने हालचाल करण्यास सुरुवात केली होती.

झाडीतून उतरून तो माझ्या समोर आला, आणि मागच्या दोन पायावर बसून एकटक माझ्याकडे बघू लागला. मला वाटू लागलं होतं, जणू काही तो माझ्या डोळ्यातून काही टिपून घेत असावा. पाच ते दहा मिनिटे तो माझ्याकडे एकटक बघत राहीला, आणि मग कुणीतरी त्याला बोलावत आहे अशा पद्धतीने उडी मारून निघून गेला. मला काहीच कळेनासं झालं होतं त्याच्या वागण्याबद्दल. शेवटी मी हायवेवर आलो, आणि लिफ्ट घेऊन गावाकडे परतलो.

## ७)पवन... एक कुतूहल...

हॉस्पिटलमध्ये होत असलेली धावपळ सगळयांच्या निदर्शनास येत होती. रितूला एक प्रकारे मानसिक धक्का बसल्यासारखा होता. कदाचित ऐकताना तिला जे काही वाटले नव्हते, पण आज प्रत्यक्षात बघतांना ती अनुभवत होती. रात्रीची ती जी काही परिस्थिती होती. तिला समोरही काय करावं? काय नाही? हा विचार गुंतत चालला होता. भिंतीवरच्या येशूला डोळ्यातले अश्रू देऊन ती सारखी मला मागत होती. तिच्या जीवनाची मनिषा अशी विझू नको देऊस, सतत हीच प्रार्थना तिच्या अंतर्गत गाजत होती.

रात्री झालेल्या धावपळीमुळे बिचारी ती माझ्या बाजूलाच निशब्द होऊन बसली होती. जिवाचं पण लावायला सुद्धा ती मागेपुढे बघणार नव्हती. तिच्या मनाची ती कठोर निष्ठा, खरंच दगडाला सुद्धा पाझर आणणारी होती. सकाळी आई आली. आल्या आल्या तिने नर्सकडून चौकशी करून घेतली. तिच्या डोळयातल्या अश्रूधारा ह्या कोसळतच होत्या. माझ्यासोबत इतकं सगळ◌ं झ◌ालं आणि नेमक्या त्याच वेळेला तिचे मातृत्व असं घरी पहुडलेलं होतं याची तिला राहून राहून

खंत वाटत होती. पण रात्रभर जागलेल्या रितुकडे तिची नजर जाताच, एक समाधान तिच्या चेहऱ्यावर आलं होतं. कि तिच्या मातृत्वाच्या नाळपेक्षा एक सप्तशृंगीची मजबूत गाठ तिथे बांधलेली होती. ज्यामुळे घाबरण्याचा काही प्रश्न नव्हता. ती रितूजवळ आली आणि म्हणाली...

बाळ रितू... रात्रभर जागीच होतीस ना... जा झोप बघू थोडा वेळ... मी आहे ना आता आले... मी बघते आता.. तू जरा विश्रांती घे बघू...

तो केव्हा उठणार गं आई... मी तर झोपेलच ना... पण त्याला उठायला सांगा ना... गेली चार-पाच वर्षे नुसता मला टाळतोय... आणि आत्तापण तेच करतोय... कावळा असेल नेमका... मागच्या जन्मात... नेमक्या जखमा टोचणारा... आवडतं ना त्याला... माझी मजा घ्यायला...

तू एकच तर आशा आहे माझ्यासाठी... कधी नव्हे ते आज मला त्याची कमतरता भासते आहे. धन्य आहेस गं पोरी, तुझ्यासारखी पोरगी सून म्हणून होशील. पण बघ ना काळाने कसे दिवस काढलेत.

त्या दोन्ही जीवांचे ते माझ्याबद्दलचे प्रेम फार अपार होते. एकीकडे आई होती, जिच्यासाठी मी तिचा आधार होतो आणि एकीकडे ती होती, जिचा मी पूर्ण विश्व होतो. आणि आता तीच माझा आधार झाली होती. नशिबाने पण काय वेळ काढली होती. जिला भेटण्यासाठी मी इतके दिवस भीत होतो. तिची भेट आणि तिचा स्वीकार सुद्धा अशा वेळी केला. जेव्हा मरणयात्रेच्या पार्श्वभागावर मी स्वतः अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करत होतो.

नुकताच काका आणि काकू पण हॉस्पिटलला आले होते. आणि सोबतच माझा एक ट्रॅकर मित्र पण आला होता. त्याने मला कितीतरी वेळा बजावलं होतं की वास्तव्य म्हणजे असणेच नाही तर प्रतीत होणेसुद्धा असते. असं कधीच नको समजू, दोन्हीचा अर्थ एक असला तरी त्याचे उच्चारण आणि आचरण वेगवेगळे आहे. तो नात्याने माझा मामा लागायचा. ट्रेकिंगचा खरा अर्थ त्यानेच मला समजावून सांगितला होता. जंगलात काय महत्वाचं आहे, त्यानेच मला प्रात्यक्षिक करून दाखवले होते. ज्याला माझ्या आयुष्यात मी जंगलाचा दुसरा राजा अशी पदवी दिली होती.

सोबतच गावचा सरपंच पण आला होता. ज्याने अव्हेरून सुद्धा सतत माझे पाय माघारीच्या विरुद्धच होते. प्रत्येकाने स्वतःचे हक्क मर्यादित रुपाने चांगले बजावले होते. आणि मी मात्र जिकडे तिकडे

हिंडत बसलो होतो. सगळ्यांना काळजीत ठेवून. एकीकडे मृत्यू माझ्या पाठीशी होता. आणि मी आत जातच होतो, ज्या वाटेला जायला शरीराची रचना मला अशी बाजूला ठेवायला लागली होती.

न्यूज घडामोडीवर आज माझ्या भागात मी पेपरचा एक ठळक हिस्सा होतो. प्रत्येकजण माझ्यात आणि इतक्यात घेतलेल्या कार्याबद्दल रूची ठेवत होता. दोन फॉरेनर पण नुकतेच येऊन गेले होते. ज्यांच्याजवळ मी सगळी कल्पना शेअर केली होती.

ऐकलं होतं जर वृत्तपत्रावर यायचं असेल तर, काहीतरी फार चांगले करा किंवा काहीतरी फारच वाईट करा. पण माझ्या आयुष्यात जे घडत होतं, ते कोणत्या पाप किंवा पुण्याचं वर्गीकरण होतं ते मला कळत नव्हतं. कारण नियतीच्या समोर माझं खेळणं झालं होतं. सतत होत असलेल्या जाणिवेमुळे मला अजून तरी हवं ते कारण मिळालं नव्हतं. ज्यामुळे इतकं सगळं असताना देखील मला निरर्थक असल्यासारखे वाटत होते. कारण मृत्यूचे खरे कारण अद्यापही मला मिळाले नव्हते. आणि जिथे मी त्याच्या जवळ जवळ जात होतो, इतक्या अथक प्रयत्नानंतरही मृत्यू माझ्या मागे लागला होता.

बातम्या वाचून कित्येकांच्या हृदयाचा आवाज, रितु आणि माझी आई अश्रूंच्या पावसासोबत ऐकत होती. प्रत्येक वेळी तिच्या मनात एकच आर्त स्वर गुंजत होता. तिला चांगलं माहीत होतं की हे सगळं लवकरच मिटणार आहे. चाबकाचे फटके बसणे, म्हणजे माझ्यावर आता मृत्यूची शेवटची वेळ आली आहे, हे तिला चांगल्या प्रकारे माहीत झालं होतं.

इकडे डॉक्टरांची मीटिंग बसली होती. सगळ्यांसाठी माझ्यावर हे चाबकाचे फटके, एक प्रकारचे कधीही न बघितलेले प्रसंग होते. आणि ज्या नर्स बहिणींनी मला बेडवर धडपडताना बघितलं होतं. त्यांची तर माझ्याजवळ उभा राहण्याची पण हिंमत होत नव्हती. त्यांना तर सगळे उच्च अधिकारी दरडावल्याप्रमाणे विचारत होते. आणि त्या भीतीने तेच सांगत होत्या जे त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी बघितलं होतं. डॉक्टरांच्यासाठी खरंच हा एक पेचात पाडणारा प्रसंग होता.

मुंबईहून डॉक्टर बोलावल्या जात होते. एव्हाना सोशल मीडिया तर्फे जिकडेतिकडे माझ्या या आजारपणाची वार्ता चालली होतीच. तर कित्येकांनी माझ्या शरीरात, काही दैवी शक्ती येत असल्याचा तर्कवितर्क केला होता. कित्येकांनी माझ्यावर काही प्रयोग करता येईल का? अशी मागणी पण केली होती.

आपल्या जगाची अशी एक आगळीवेगळी गंमत आहे. सतत प्रत्येकाला काहीतरी नवीन पाहिजे असतं, आता माझ्याबाबत ठिक आहे. पण जरा काही वेगळे आढळून आले, की लोक धाव घेतील तिकडे. स्वतःचे पैसे नाश करतील किंवा ऑफिसला कामाला सुट्ट्या मारतील. स्त्रिया घरचे काम थांबवतील, पण बघायला जाणारच. पण या दोन दिवसात हॉस्पिटल कमी आणि म्युझियम जास्त झालं होतं. एक छोटीशी गोष्ट महाभारत घडवू शकते याचे उदाहरण होतो मी.

माहिती सांगायला एक गंमत वाटेल. पण मी हॉस्पिटलला असताना एक हवालदार दरवाज्यात पहारेकरी ठेवला होता. काय नाव त्याचं सखाराम. खरंतर इतक्यात जायची गरज मला किंवा माझ्या घरच्यांना कधीच वाटली नाही. पण अलीकडे राठोड नावाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी केलेली ही निर्देशिका होती. त्याच्यासमोर अख्या अख्ख्याची घामाने अंघोळ व्हायची. दारू विकणाऱ्यांची तर तो हवा कैद करून टाकायचा.

ज्यावेळेस नमनची केस पोलीस स्टेशनमधून उचलण्यात आली होती. त्यावेळेस त्या पोलीस स्टेशनचा सिनियर इन्स्पेक्टर हाच होता. आणि खरं सांगायचं म्हणजे, नमनचा खुलासा त्यानेच केला होता. मी

सांगून बघितलं होतं त्याला, आमच्या मृत्यूयोगाबद्दल, पण त्याला डोळ्याला दिसत नसलेल्या आभासावर काहीच विश्वास नव्हता.

कुणीतरी प्लॅन करून आमची मर्डर करतोय, अशी त्यांची सुनावणी होती. आणि मला ही गोष्ट पुढ्यात वाढवायची नव्हती. त्यामुळे मी हो ला हो केलं होतं. आणि चालू लागलो होतो. पोलीस स्टेशनमधून. त्याच्यासाठी मर्डर करणारा आतातरी भेटावा म्हणून त्याने फार प्रमाणात आटापिटा केला होता.

सगळ्यात आधी त्याने माझ्याविषयी कुतुहूल वाटणाऱ्या कित्येकांचा, दारावर हवालदार ठेवून बंदोबस्त केला होता. आईची किंवा रितूची मुलाखत घेणाऱ्या कित्येकांना कठोर सुनावणी दिली. आणि दैवयोग, मृत्यू मागे लागणे अशा प्रकारची कोणतीही गोष्ट अस्तित्वात नाही. अशी त्यांनी सोशल मीडियावर अस्खलित भाषणावली दिली. माझ्यामुळे थोडक्यात प्रदूषित झालेले वातावरण त्यांनी साफ केले. इतकंच नव्हे तर पर्सनल रूममध्ये मी असतानादेखील, माझी रवानगी सीसीटीव्ही निगराणीत असलेल्या खोलीत ठेवली. जिथून एखादा फुलपाखरू सुद्धा यायला त्यांची परवानगी मागावी लागेल.

रोज वेळोवेळी बदलणारे डॉक्टर पाहून रितू स्वतः एका मृत्यू देहात साकार होत होती. कारण दिवसागणिक होणारा बदल सातत्याने तिच्या मनात मृत्यूचा न्यूनगंड भरत होता. ज्यामुळे तिला तिच्या जीवनापेक्षा माझ्या मृत्यूची फार जास्त चिंता वाटत होती. आता तिचं शेवटचं एकच मागणं उरलं होतं. कि जाताना मी एकटा न जाता तिलाही सोबत घेऊन जावं. जिवंतपणी साथ मिळाली नाही, कदाचित दोघांच्या मृत्यूनंतर तरी साथ मिळणार.

सगळ्यांच्या बाबतीत ठिक होतं, फक्त मीच एक झोपलेला होतो. काका आणि काकूंनी आईला थोडं सांत्वन दिलं. आणि रितुला काळजी घे असं म्हणत निघून गेले. नेहमी सारखी आई माझ्याकडे एक मायाळू कटाक्ष टाकत निघून गेली. खरंतर तिला जायचं नव्हतंच. पण रितूचा डबावगैरे तीच आणून द्यायची. त्यामुळे जावं लागायचं. आणि कदाचित हॉस्पिटलचं वातावरण वगैरे सुद्धा तिला भावत नव्हते. सतत तिला आजारी असल्याचा भास व्हायचा. पोटचं पोर म्हणून ती जीवाची दैना करत यायची. रितू हे सगळं समजून घ्यायची, त्यामुळे शक्यतो आईला पाहिजे तेवढा त्रास नाही द्यायची.

आई गेल्यानंतर मी आणि रितू दोघेच तेवढे रूममध्ये उरले होतो. आणि वर कॅमेरा आमच्यावर पाळत ठेवून उभा ठाकला होता. तिच्या मनाची करुणा आणि भावना माझ्याशी नेहमी रुंजी घालत होती.

त्यामुळे शेवटपर्यंत तरी तिच्या श्वासाला मीच सक्षम आहे असे तिला वाटायचे. नेहमीसारखं माझ्या बेडला खुर्ची लावून, माझा हात स्वतःच्या हातात घेतला. आणि डोकं टेकवून ती माझ्याशी ओल्या नजरेने हितगूज करू लागली.

मनातून... उठ... ना... रे... एकदा मला रितू नावाने तरी हाक मारणारे... एकदा मला हाक मारणारे... सारखे मंत्र जपत होती, न जाणे कितीवेळ... आणि त्याच सहवासात झोपून गेली.

रात्री कसल्यातरी धक्क्याने ती पडता पडता सावरली, हे जाग आल्यावर तिला कळलं. माझं शरीर हवेत बेडवरून चार-पाच फुटावर गेलं होतं. आणि चट चट चाबकाचे फटके पडू लागले होते. परत एकदा तिची घाबरगुंडी उडाली होती. आणि धावत घाबरतच स्टॉपची तिने दारे ठोठावली. रात्री बाराच्या दरम्यानची वेळ होती. सगळे निपचित निद्रेच्या आहारी नुकतेच गेले होते. पण परत रितूचा हल्ला आहे, पेशंटविषयी, हे ओळखून सगळ्यांनी मग धाव घेतली. एव्हाना सगळे पोहोचले होते. तरी माझा देह हवेवर तरंगून होता. मला पाहून डॉक्टर पण शॉक झाले होते. आणि चाबकाचा वार त्यांच्याही कानाशी गुंजू लागला होता.

ताबडतोब हिम्मत करून काही वार्डबायने मला खाली आणले. परत ऑक्सिजन आणि सलाईनवर लावले. सगळ्यांना माझ्याविषयी एक प्रकारचं कुतूहल आता पुन्हा एकदा जागृत झाला होता. त्यांना भीती वाटू लागली होती. माझ्याबद्दल काय घडत आहे? कसे घडत आहे? शेवटी काय प्रकरणआहे? सगळ्याना चिंता वाटू लागली. मला लवकरात लवकर रेफर करावं असं सर्वांचं मत झालं.

झालेल्या खळबळीमुळे कित्येकांची झोप मोड झाली होती. सीसीटीव्ही मध्ये सगळं काही रेकॉर्ड झालं होतं. राठोडचा फोन केव्हाच खणानला होता. त्यामुळे त्याची गाडी आवाज करत हॉस्पिटलच्या आवारात नुकतीच पोहोचली होती. बुटांच्या टप टप आवाजाने त्याने शिड्या चढल्या आणि माझ्या रूममध्ये आला.

मला बघताच त्याला फार वाईट वाटून गेले. रक्ताने माखलेले शर्ट रीतूने काढताना अंगावर असलेले जखम दिसून आले होते. परत एकदा रक्ताने माखलेले शरीर डॉक्टरने कापसाने साफ केले. पण राठोडची शोधक नजर माझ्या जखमांवर नव्हती. माझ्याकडे एक उपकारात्मक नजर टाकून तो पडदे उचलून बघू लागला. खिडक्या उघडून बघू लागला. चाबुक कुठेतरी मिळते का? याची शोधाशोध करू लागला. येताना जाताना कुणी कुणाला बघितले काय? त्याने चौकशी चालू केली होती. पण प्रत्यक्षात काय घडलं होतं. हे माहीतच कुणाला होतं.

शेवटी त्याची शोधक नजर कॅमेऱ्यावर गेली, आणि तर्कवितर्क करून तो टप टप आवाज करत निघून गेला ऑपरेटर रूमकडे.

ऑपरेटर रूममध्ये आल्यावर जरा कडक आवाजामध्ये... शिंदे काय चालू आहे? आता जे झालं ते कॅमेरात नोंद झालं आहे का?

सर मी तर बघितलंय, पण माझी हिम्मत होत नाही आहे. सर हे तुम्हीच बघा. शिंदेने राठोडला कॅमेरा फुटेज ओपन करून दिला, आणि तो बाजूला उभा राहिला.

इतकं भिता तर मग कशाला पोलिसात भरती होता? . घरीच बसायचं ना.. असे गरजत मग राठोड फुटेज बघायला लागले. आणि जे काही त्यांनी बघितलं, खरंतर ते पाहिल्यानंतर स्वतःच घामाघुम झाले. बघून झाल्यावर मागच्या खिशातून रुमाल काढली आणि शिंदेना पाणी आणायला आदेश दिला.

खरं काय असतं, शेवटी डोळ्यांना दिसतं तेच ना. माझ्यासमोर राठोडने हेच वाक्य म्हटले होते. पण आज डोळ्यांनी बघितलं ते काय होतं? काय विचार घ्यावा? आणि काय करावं? राठोडना हा गुंता फार कठीण प्रमाणात पडला होता. रात्रभर ती फुटेज ते वरचेवर बघत होते.

पण त्यांना त्यांच्या डोळयावर विश्वास बसत नव्हता, की खरंच असं होऊ शकते.

आणि जर काही खरं असेल तर चुकलं माझं. आपण ऐकायला होतो पवनचं. जर त्यावेळेस मी त्याची मदत केली असती, तर आज पवनवर ही पाळी नसती आली. किती चुकलं माझं, नियमांच्या बाहेर पडू नये म्हणून आज माणुसकीच्या कर्तृत्वाला मुकलो मी. पण नाही... हा जो कोणी आहे याचा शोध आता लावलाच पाहिजे. पण कोण असेल हा? ज्याला इतकं अक्राविक्राळ रूप आहे, त्याच्या नुसत्या प्रतिमेने वार होतात. आज राठोड विवंचनात बुडून गेले होते. त्यांचं काय चुकलं आता ते ठरवत होते.

## ८)नमनची भेट...

साधुमहाराजांशी बोलून झाल्यावर, माझ्या मनाची पूर्तता झाली होती. नकळत त्यांनी मला खूप काही सांगितले होते. अस्तित्वाचा पुरावा हा मला त्यांनी डोळ्यादेखत दिला होता. ज्यामुळे सत्य आणि सत्व यामध्ये काय अंतर आहे हे मी जाणू शकलो. गावाकडे परतल्यावर माझ्यावर थोडाफार झालेला बदल सगळ्यांनी अचूक हेरला होता. पण नेमकं काय झालं? अशी विचारणारी फक्त रितू होती.

त्यादिवशी कुठेतरी जायला निघालो होतो, की दरवाज्यात तिचे पाऊल पडले.

काय मालक कुठे चालले? तिचा पहिलाच प्रश्न.

अगं कुठे नाही... मला नमनचा शोध घ्यायचा आहे ना... त्याच्यासाठी सोशल मीडियावर काहीतरी प्रयत्न करतो.

अच्छा... प्रवास कसा झाला? काही मनासारखे घडले ना!!! की काही अजून विपरीतच होणार. भेटला काय तो माणूस? ज्याने तुला ती थैली दिली होती.

नाही तो तर भेटला नाही, पण त्यापेक्षाही असा व्यक्ती मिळाला. ज्याने मला त्यापासून एक समाधान दिलं. चिंतामुक्त केलं... त्यांनी मला अगदी कसलाही त्रास न देता सांगितलं. मला आता काय करायचं म्हणून? मग मी तिला अतपासून इतीपर्यंत सगळं कथन केलं.

आधी ती घाबरली, मग रडायला लागली. केव्हा संपणार रे हे सगळं... तुझ्यासोबत जगण्याचे एक स्वप्न बघत आहे मी. केव्हा ते पूर्ण होणार. तू नसतोस ना तर श्वास कोंडल्यासारखा होतो माझा. पण कळत नाही मला नेमकं काय करावं? तू नेहमी असा डोळ्यासमोर राहावं असं मला वाटतं.

शेवटी मी पण म्हणालो... असेन ना गं.. शेवट नसेल तर मी तुझाच असेन, या एकाच वाक्यात तिने मिठी सैल पाडली. आणि मी तिला काहीच न म्हणता उंबरठा ओलांडला. ती मात्र माझी सावली सुद्धा पुसटशी होतपर्यंत माझ्याकडे बघत राहिली. खरं तर मला तिचं मन दुखवायचं नव्हतं. पण घडलेल्या गोष्टीशी समरस होऊन मी तिच्याशी

काढलेली सलगी असं म्हणू शकतो. आणि खरंतर मला येऊन तीन दिवस झाली होती, पण मी तिला शब्दाचाही निरोप दिला नव्हता. उलट खोटे बोललो होतो. नमन बद्दल सोशल मीडियावर काही तरी पोस्ट टाकायची आहे म्हणून.

नमन बद्दल फार आधीच चौकशी पत्र चालू केलं होतं. त्याच्या नंबरचं लोकेशन घेऊन त्याच्या घरून मिळालेला नाव, पत्ता आणि त्याच्या मैत्रिणीच्या भेटायच्या वेळा हे सगळं मी केव्हाच केलं होतं. पण आज कुणीतरी मला फोन केला होता की एक वेड्यासारखा मुलगा रोज या मठात येताना दिसतो. मठात काय तो बाबा असतो म्हणे, थोडाफार यंत्रतंत्रांच्या गोष्टी करतो त्यामुळे जातात त्याच्याकडे काही भित्री माणसं. आणि त्यात आमच्यात असलेला नमन, आम्हा सगळ्यापेक्षा भित्रा होता, हे सगळे जाणून होतो. त्यामुळे तो कुठे जाणार हे सुद्धा माहिती होतं.

नमन अतिशय कोवळ्या मनाचा होता. आणि एकदम कोऱ्या मनाचा. ग्रामीण भागात चण्याच्या झाडावर चढवणे म्हणतात त्याप्रमाणे एखाद्या गोष्टीबद्दल त्याला वरचढ करून सांगावे तर हा माणूस ते करणारच. आणि भित्रा तर इतका की हॉरर बघितल्यावर रात्री झोपायला सुद्धा, सतत त्याच्या मागावर असायला पाहिजे असतं. पण हा इतका भित्रा सगळ्यांच्या नकळत एकटं कसं काय राहायला शिकलाय? हा

एक प्रश्नचिन्ह होता. आणि वर असल्या भोंदू बाबावर त्याचा केव्हापासून विश्वास बसायला लागला. या सगळ्याची उत्तर फक्त तोच देऊ शकत होता.

आज ज्याने मला फोन करून नमनबद्दल सांगितले होते. तो माझा क्लासमेट आदित्य होता. तो मठासमोर इलेक्ट्रिक दुकान चालवतो, आणि त्या दिवशी त्याची आणि माझी भेट झाली होती. नमनचा शोध करतोय हे त्याला माहिती झालं आणि त्याने तसा मला फोन लावला.

मी त्याला सगळ्यात आधी पूर्वसूचना दिली होती. तसा त्याने नमन आता एवढ्यात येणार या टाईमला त्याने मला बोलावले. सहज गप्पा गोष्टी आमच्या चालू असतानाच अचानक आदित्य खेकसला. मी तेव्हाच ओळखून घेतलं, आणि मागे वळून बघितलं, तर घाईघाईत नमन जाताना दिसला. चालताना त्याने इकडे तिकडे बघावे असे कदाचित त्याला वाटले नसावे. शेवटी जाताना मागे आपला कोणी पाठलाग तर करत नाही ना, अशी त्याने नोंद केली. आणि तो मठाच्या प्रवेशद्वारातून आत गेला.

शेवटी मठातला बाबा सांगतोय तरी काय? मलाही त्याची उत्सुकता लागलेली होती. आणि नेमकं गेल्यावर त्याचं समाधान तरी कशाप्रकारे होतं. हे सुद्धा मला ऐकायचं होतं. म्हणून नमन मागोमाग मी सुद्धा गेलो.

प्रवेशद्वारापासून मोठ्या दालनापर्यंत स्वागताला रंगीत गालिचा पसरलेला होता. जिथे तिथे त्या बाबाचे काही मान्यवरांना आशीर्वाद देतानाचे पोस्टर अडकवले होते. मला त्यात इंटरेस्ट नव्हता, म्हणून मग मी परत नजर अव्हेरली आणि पावले उचलत दालनात आलो.

दालनात हजारो लोक बसतील अशी सोय होती. जागोजागी गाद्या अंथरल्या होत्या. एका बाजूला पुरुष आणि एका बाजूला स्त्रिया यांची भली मोठी रांग मला दिसली. कुणाच्या अंगात शिरलं होतं, कुणाला कुणीतरी लावलं होतं, कुणाचीतरी स्मृती गेली होती, असे अनेक आजार आणि उपाय फक्त एकच "योगी बाबा". नुकतंच कुणीतरी "योगी बाबा की जय" म्हणून उच्चारलं म्हणून त्यांचं नाव तरी माहीत झालं. इतरांसारखं मीसुद्धा पुरुष जातीच्या रांगेत जाऊन बसलो.

समोर दुसऱ्या तिसऱ्या नंबरवर नमन होता. अचानक एक गृहस्थ आमच्याकडे आला आणि म्हणाला, ज्यांना कोणाला लवकरात

लवकर योगी बाबांचे मार्गदर्शन हवे आहे त्यांनी माझ्याबरोबर या. पण त्यांचे वेगळे पैसे होतील. नमनने त्याला हाक मारली. पैशांची पुंड करून त्याच्या हातात दिली आणि त्याच्या मागोमाग जाऊ लागला, तो नजरेआड होऊ नये म्हणून मी पण त्याच्या मागोमाग जाऊ लागलो.

त्या गृहस्थाने त्याच बाजूला थांबण्यास सांगितले, आणि तो त्याच्या बाबाकडे चालू लागला. मी हलकेच नमनला हाक मारली, त्याने माझ्याकडे वळून बघितले, आणि त्याच्या चेहऱ्यावर परत निराशेचे भाव पसरले. असं वाटत होतं, मला बघून तो आनंदित नाही, तर माझ्यामुळे त्याला त्रास होतो आहे. मी त्याच्याजवळ गेलो. पण काहीशा अंतरावर जातो तर तो निघून जाण्यासाठी बघत होता.

थांब नमन... त्याला हाक मारली मी...

त्याच्या जवळ आलो. बघितलं तर तो मान खाली घालून उभा होता. माझ्याशी बोलण्याची त्याला आता भीती वाटत होती. इतक्या दिवसानंतर तो मला भेटतो आहे पण कसा आहेस? ईकडे कुठे आलास? असे साधे प्रश्नसुद्धा त्याने मला विचारले नव्हते. एरवी असं कधी झालंच नव्हतं. तो बोलणार हे अपेक्षित होतं, पण मग मीच सुरुवात केली.

नमन माझ्यापासून पळ काढून जर तुला मुक्ती मिळत असेल, तर निष्कारण काढ. पण ज्याअर्थी हे सगळं तुला चांगल्याप्रकारे माहिती आहे. तू असं वागु तरी कसं शकतोस. ना मृत्यू तुझं चुकणार आहे, ना माझं. पण मग इतकी लपाछपी... कशासाठी? .. या असल्या भोंदू बाबाकडे येऊन काही होणार नाही. त्यासाठी आपल्यालाच काहीतरी करावे लागेल. आपल्यालाच काहीतरी मार्ग शोधावे लागेल.

एव्हाना हे सगळे ऐकून केव्हाच नमनचं हृदय पिळवटलं आणि त्याने मला घट्ट मिठी मारली. त्याच्या डोळ्याच्या पाण्याने माझ्या खांद्यावर ओलसर असा स्पर्श जाणवला. सर्व करून पहावे पवन, आयुष्यात काहीच अपुरे राहू नये. चल मित्रा तुझी इच्छा आहे, तर मग येऊया बघून. बाबा जवळ गेलेला गृहस्थ आम्हाला हातवारे करून बोलवत होता. समोर फार मोठा असा स्टेज होता. ज्यात एका बाजूला हवन पेटत होतं. एका बाजूला विचित्र अशा काळया रंगाच्या बावल्या होत्या. त्यावर निंबू, कुंकू, टाचणी अशा काही विचित्र वस्तू होत्या. आसनावर पद्मासन ग्रहण केलेला तो विचित्र बाबा कूंकुवाची आडवी रेघ त्याने आपल्या कपाळाला माखलेली होती. तोंडानी सतत कसल्यातरी मंत्रांचा उच्चारण करत, कमरेतून डोलत होता. दोन स्त्रिया त्याच्या सेवेशी होत्या. डोक्यावर बांधलेल्या फडक्यावर त्याने उजवा

हात मांडला आणि नमनला असे पुढ्यात बसवले. मी बाजुलाच बसून तो काय विचारतो? किंवा काय करतो? बघत होतो.

काल सांगितलेली पूर्ण विधी केली काय?

हो महाराज केली.

तुझ्या अंगावरून सात वेळा तो निंबु घेऊन, त्याचा उतारा काढायचा होता. आणि गुपचूप कुणाला न सांगता निर्जन जागेवर फेकायचा होता.

होय महाराज मी अगदी तसेच केलं.

मूर्ख मला शिकवतोय... तुझं मंगळ अजून गेलं नाही आहे, त्याची परिमा दिवसेंदिवस वाढतच आहे. नक्कीच तू काहीतरी चुकी केली आहेस.

मी काही चुकी केली नाही महाराज, तुम्ही जसं सांगितलं मी तसंच केलं...

मूर्ख मला शिकवू नको, तुझा मंगळ जागेवर नाही, दिवसेंदिवस तो लुप्त होत चाललाय... तुला आता परत नवीन पूजा करावी लागणार आहे. त्याशिवाय तुला आनंदी जीवन कधीच मिळणार नाही. आणि लवकरात लवकर ती पूजा उरकून घे... मग आनंद आहे.

होय महाराज.

त्या पेटीत पूजेला लागणाऱ्या सामग्रीचे पैसे जमा कर. आणि ही विभूती घे. रोज सकाळ दुपार संध्याकाळ सेवन करत जा... निघ आता...

मठाच्या बाहेर आल्यावर मला नमनचा फार राग आला होता.

काय चाललंय नमन... या असल्या फालतू लोकांमुळेच ना, आपण स्वतःचे सामर्थ्य घालून देतो. पण आता तू तरी याला बळी नको पडू.

मग काय करू? माहित आहे आपले तीन जिवाभावाचे मित्र आपल्याला सोडून गेलेत. आणि आता आपण दोघेच उरलो आहोत. मला असं नाही मरायचं. मला जगायचं आहे. आयुष्यात अजून खूप

काही बघायचं बाकी आहे. आणि यासाठी मी वाटेल ते करायला तयार आहे. बाबाचं काय? मी आता अमेरिकेला सुद्धा जायला तयार आहे. जर मला समाधान मिळत असेल तर.

मग काय तुला इथे समाधान मिळालं.

( तो इकडे तिकडे बघत मान खाली टाकली त्यांनी)

अरे जगायचं कुणाला नाही आहे. काय त्या तिघांना जगायचं नव्हतं? काय मला जगायचं नाही? म्हणून काय अशा भोंदू बाबांचे पोट भरायचे. त्यांच्यावर असा पैसा उधळायचा. अरे ज्याला स्वतःचे भविष्य माहीत नाही, तो काय तुला सुख मिळवून देणार.

म्हणजे म्हणायचं काय तुला?

बघ... जे आपल्या नशिबात आहे ना, ते घडणारच आहे. त्यात कुणीच बदल करू शकत नाही. या सगळ्यात एक फार मोठं रहस्य दडलंय, ज्याची तुला यत्किंचितही माहिती नाही. आपण ती गोष्ट घालवली, त्यामुळे आपण आपले मित्र गमावून बसलो. पण आता मला कुणालाच गमवायचं नाही. गेल्या काही दिवसात मी काय काय बघितलं, काय काय विचार केलं, हे तुला काहीच माहिती नाही. आणि

मी परत एकदा नमनला भुजंगाची भेट आणि साधूमहाराजांचं महत्त्व त्याला सांगितलं.

इतकं सगळं पाठिशी लागलाय तरी तुला त्याची काही चिंता नाही. इतका साधा कसा राहू शकतोस यार.

परिस्थिती याची सवय करून देते. जसं की तू करून घेतलीस. कधीही घाबरणारा, आज असतोस ना एकटाच. कुणाच्या आधारात नाही, कुणाच्या वास्तव्यात नाही, स्वतःला बदलतांना कधी बघितलंस स्वतःला.

मी भरकटलो होतो रे जीवनाला. सद्या मरण पावला तेव्हा ते एक मरणयोग असेल म्हणून मी गप्प राहिलो. खरं सांगायचं म्हणजे त्यावेळी तरी तुझ्या बोलण्यावर माझा विश्वास नव्हताच मुळी. पण अमर तर माझ्या सगळ्यात जवळचा यार होता. त्यादिवशी सद्याच्या मरणानंतर मी मग पुण्याला स्थायिक झालो. पाच आठ महिने गावाकडे परतलोच नव्हतो. आणि कामाचा एवढं डिप्रेशन होतं की कुणाला फोनही करावेसे वाटत नव्हते.

तसं पण आम्ही सगळे तुला वेड्यातच काढले होतो. त्यामुळे अमरने आणि प्रदीपने तुला डिस्टर्ब न करण्याचा विचार केला होता. त्यामुळे आम्ही फारसे तुझ्या कॉन्टॅक्टमध्ये नव्हतो. पण त्यादिवशी रात्री अचानक साडेबारा एकच्या दरम्यान अमरचा फोन आला. वेदना आणि भय असलेला त्याचा आवाज मी कधीही विसरू शकणार नाही. या कानांनी ऐकलेले चाबकाचे वार मोबाईलच्या स्पीकरवर स्पष्टपणे ऐकायला येत होते. आणि पाठोपाठ अमरच्या वेदनेच्या भरलेल्या हाका किती वेळ माहीत नाही. मी फक्त फोनवर हॅलो हॅलो करत राहिलो होतो. त्याही दिवशी तुम्ही माझ्याशी गंमत केली असेल, या विचाराने मी नंबर चेंज करून टाकला होता. आणि इकडे अमरच्या मृत्यूची वार्ता तुमच्या सगळयांच्या कानावर आली.

याचा अर्थ तुला वाटलेल्या गमतीमुळे, तु अमरच्या मरणाला आला नाहीस. पण मग प्रदीपच्या मरणाला का आला नाहीस?

त्यानंतर मी वर्षभर अजून मेहनत घेतली. मित्रांना काय तोंड दाखवणार म्हणून. शेवटी मेहनतीचं फळ मिळालं. माझं प्रोजेक्ट पास झालं. बॉसला तो प्रोजेक्ट खूप आवडला, बॉसने त्याला विकत घेण्याचे ठरवले. त्यासाठी त्या प्रोजेक्टचा डेमो द्यायचा होता. त्यावेळी सहज

घाईघाईत मी ऑफिसला निघालो होतो. अचानक प्रदीप मला रस्त्याच्या कडेला ट्रॅफिक वर भेटला. मी घाईत असल्यामुळे फारसा बोलू शकलो नाही. म्हणून माझं नवीन नंबरचे कार्ड मी त्याला दिला. आणि आठवणीने सायंकाळी फोन कर म्हणून त्याला सांगितले. पण त्याने काही फोन केला नाही. आणि प्रोजेक्टच्या भानगडीत असताना मीसुद्धा त्याकडे पाहिले नाही. ज्या दिवशी ऑफिसमधून घरी आल्यावर मला फोन आला त्यादिवशी प्रोजेक्टच्या अप्रतिम यशानंतर बॉसने खास पार्टी ठेवली होती. त्या पार्टीत जरा जास्त प्रमाणात अल्कोहोलचे प्रमाण घेतल्यामुळे मला फार नशा चढली होती. पण जसं अमरचा चित्रविचित्र फोन आला होता. त्याचप्रमाणे प्रदीपचा पण फोन आला होता. शेवटची त्याची एकच हाक कानात गुंजत होती. नमन वाचव... मला वाचव मला... आणि ते चाबकाचे फटके स्पीकरवर स्पष्ट ऐकू येत होते. नशेमुळे त्याही वेळेस मला काहीच कळले नाही, आणि मी झोपून गेलो.

सकाळी जाग आल्यावर मी प्रदीपला रिटर्न फोन लावायचा खूप खूप प्रयत्न केला, पण फोन लागतच नव्हता. त्यानंतर एक-दोन महिन्यांनी मी आपल्या गावाकडे परतलो. घरी आल्यावर कळलं की अमरचा आणि प्रदीपचा मृत्यू झाला आहे. आणि दोन्ही वेळेस त्या विचित्र कारणामुळे त्यांचा मृत्यू झाला आहे हे माझ्या लक्षात आलं.

पण सगळ्यात वाईट मला तेव्हा वाटले की मी एक मित्र असूनसुद्धा त्यांची कशाप्रकारे मदत करू शकलो नाही. माहित आहे पवन, शेवटची हाक त्यालाच मारली जाते ज्याच्याकडून काही अपेक्षा असते. आणि ते तर माझे सख्खे जिवाभावाचे मित्र होते. मी गंमत समजून त्यांचे फोन कापत राहिलो आणि ते तिकडे श्वास सोडत राहिले. पण मी त्यांची काहीच मदत करू शकलो नाही. मी त्यांची काहीच मदत करु शकलो नाही. लाज वाटू लागली मला, त्यांनी मला मित्र मानल्याची.

त्या दिवसानंतर मी विचार केला. तू त्या दिवशी बोललेलं खरं आहे. मी अख्खा महिना घराच्या बाहेर निघालो नव्हतो. आणि त्या दिवशी निघालो तर विचार करूनच. मृत्यू तिघांना घेऊन गेलाय, उरले आपण दोघे फक्त. पण आता या दोघांपैकी पहिला कोण आहे? हे माहिती नाही. जर माझा मृत्यू पाहिला असेल तर आधीच मला त्याची पूर्वतयारी केलेली बरी.

घरून निघताना एकच विचार केला. कुणालाच याबाबतीत काही सांगायचं नाही. काही चूक नसताना आपण जी शिक्षा भोगतोय त्याचे दुःख आपल्या घरच्यांना कशाला, त्यामुळे त्या दिवसापासून येथे लपून असतो. जीवन जगण्याचा, जगविण्याचा प्रयत्न करत, सतत कुणा

तांत्रिकाच्या शोधात तर कुणा मांत्रिकाच्या शोधात. जेणेकरून माझ्या जगण्याचे दिवस वाढतील या आशेवर.

मग इतक्या दिवसात काय मिळवलास? आणि हो तु अशा बाबांवर विश्वास ठेवायला लागलास, तू तर एक नंबरचा नास्तिक होतास. मग या नादात कसं काय पडलास?

अरे पवन... असे कित्येक प्रसंग आहेत. ज्यांना आपण योगायोग म्हणू शकत नाही. आणि जे योगायोग नसते ते दैवयोग असते. असं कुठेतरी वाचलेलं आहे मी. ज्या अर्थी तुझं नाव घेऊन त्या इसमाने तुला बोलावलं, नक्कीच त्याला तुझ्याकडून काहीतरी पाहिजे होतं. त्याला अपेक्षित होतं पण दिला तर काय मृत्यू.

अरे हो पण सांगितले ना, त्याने आपल्या मृत्यूविषयी कल्पना दिली होती. तो महाराज एक शिष्य होता. खुद्द साधू महाराजांनीच मला तसं सांगितलं होतं. आणि समोर जाऊन तोच आपल्याला मदतही करेल, असं त्यांनी मला सांगितलं होतं.

मग तुला काय वाटतं? आता काय करायला हवं? कारण फार त्रासलो रे मी या अशा जीवनाला. मी असं बोलून सांगू शकत नाही.

अशा पद्धतीने माझ्यात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला आहे. तुला माहित आहे, माझी मैत्रीण रिना. जाताना तिच्या डोळ्यातले अश्रू बघणे अवघड झाले होते.

ज्या दिवसापासून मला हे सगळं माहिती झालं. त्या दिवसापासून मी सगळ्यांचा नादच सोडून दिलं होतं. कधी कुणाच्या नजरेस पडू नये. मी कुठे आहे त्याचा थांगपत्ताही लागू दिला नाही. पण आज तू शोधलंस. खरं तर माझा असल्या गोष्टींवर विश्वास बसत नाही रे. कारण जगासमोर आपण काही दाखवतो म्हटलं, तरी त्यांना प्रत्येक गोष्टीचं प्रुफ पाहिजे असतं. आणि इतक्यात अशा गोष्टी घडत आहे की त्याचं काही प्रुफ जमा होत नाही. विचार केला की याच्यावर मार्ग काय काढायचा, पण सुचतच नव्हते. घरी नुकतंच एका वृत्तपत्रावर योगी बाबा का चमत्कार म्हणून एक पोस्ट पाहिली. त्यावर काही जणांचा अनुभव वाचून पाहिले, तेव्हा न राहवून मनात एक अपेक्षा जागृत झाली. की हो ना हो याच्याकडे काही उपाय असेल, तर करून बघायला काय हरकत आहे.

गेल्या महिनाभरात माझं पाचव्यांदा तरी इथे येणं झालं आहे. पण काय? प्रश्न तेच आहेत कायमचे. हे बघ असली करामती अंगठी सुद्धा बोलावली. (हातातली अंगठी दाखवत. )पंडित लाइव्ह बोलता-बोलता माझं डोकं दुखून जाते. यात काय नको ते प्रयत्न केले. पण शेवटी

निराशाच हाती लागली. मनातून कितीतरी वेळा वाटलं. तुझी भेट घ्यावी, पण घाबरत होतो.

अरे घाबरण्यासारखं काय? जशी तू तुझ्या परिस्थितीशी उचल खाल्ली. तसेच मी पण खाल्ली. फक्त तूच नाहीतर मी पण सोसले आहे. आज आपण दोघे मृत्यूच्या एकाच वाटेवर आहोत. आणि दोघांनाही आता आपला जीवन जगण्याचा पुरेपूर प्रयत्न करायचा आहे. फक्त एकच गोष्ट मनाशी बाळग, तू कधी धीर नको सोडू.

नाही सोडणार मित्रा... आता तुझ्यासोबत मी एका नव्या उमेदीने जगायचं ठरवले आहे. पण माझी एक अट आहे. जोपर्यंत मृत्यूप्रकरण समाप्त होत नाही. तोपर्यंत प्लिज मला कुणाच्या नजरेत आणू नकोस. माझे आई-वडील विचारतील, तरी मला काहीच माहिती नाही असं सांग.

पण असं कसं बोलतोस तू. ते आपले आई-वडील आहेत. त्यांना आपली काळजी नसेल तर कुणाची असेल. जर आपल्या आयुष्यात अगदी थोडे दिवस असतील, तर ते पूर्ण आपण त्यांच्याच सहवासात घालावे.

मी सगळ्या गोष्टींना राजी होतो. पण आई-वडिलांच्या बाबतीत मी त्यांना रडताना नाही बघू शकत. त्यापेक्षा मी कुठेतरी आहे याचे समाधान त्यांना शेवटपर्यंत असू दे. आणि कधी वेळ मिळालाच तर रिनाला भेटून, माझ्याविषयी असं काही वेगळं बोल, की ती सुद्धा मला विसरून, कुणाशी तरी लग्न करायला मोकळी होईल. मला हे सगळे आत्तापासूनच करावे लागणार आहे. कारण माझं सगळ्यांच्या नकळत निघून जाणे चांगलं आहे. पण त्यांना असं रडवत ठेवणं चांगलं नाही. करशील ना मित्रा माझ्यासाठी एवढं.

तुझ्यासाठी सगळं करायला तयार आहे. पण मला वाटतं की तू चुकतोयस. तुझं हे असं वागणं, मला पटत नाही आहे. तू विचार कर यावर. कारण जे सुख इतरांसोबत वाटलं, आता त्याच दुःखाच्या प्रसंगी ते सगळ्यांपासून लपवावे. अरे कोणीतरी म्हटलंय की माणसे कांद्या सारखी भोवताल जमा करावी. खांदा कधीच कमी होता कामा नये आणि तू हे चक्क टाळतोयस.

तुला नाही कळणार पवन. पण ते दुःख मला कधीच सहन होणार नाही. भलेही मग मी ह्या जगात असेन किंवा नसेन, पण तुला मात्र माझ्या मैत्रीची शपथ आहे की तू ते करणार.

माझ्याकडे तसा पर्याय नव्हताच. म्हणून मी एक निराशेचा उसासा टाकला, आणि होकार दिला. पण नंतर माझी बोलायची काहीच हिम्मत नव्हती. आणि तोही इकडे तिकडे बघू लागला. शेवटी नाते कसे टिकवायचे या नमनने मला शिकवले. सुखाचे बोट धरून दुःखाचे डोंगर चढताना मी कित्येकदा बघितले. पण दुःखाचा अख्खा डोंगर बाजूला घेतलं होतं त्याने, आणि सुखाची क्षण सुखातच ठेवली. त्याची भावना हृदयाला चिरून जाणारी होती. त्यामुळे मी त्याचे कौतुक करावे तितके मला कमी वाटत होते. कुठे राहतो मी येतो तुझ्याबरोबर.? मी हलकेच त्याला विचारले...

नाही पवन मृत्यूच्या मार्गावर आपण जरी का एकत्र असलो, तरी इथून माझी वाट मात्र वेगळी आहे. तुला जर कधी मला भेटावयाचे असेल, तर या नंबरवर कॉन्टॅक्ट करत जा. एक कार्ड हातात देत तो म्हणाला.

हल्ली मला तुझं काहीच कळत नाहीये नमन. नात्यांशी इतकं नास्तिकपणा बरं नाही.

प्लिज पवन.

ओके ओके जशी तुझी मर्जी.

आम्ही निघायला लागलो. पाठमोरा त्याला जाताना बघून न राहवून मला असं वाटत होतं. की तो मला सोडून चाललाय. त्याच्याबद्दल मनात भीतीचं सावट उभारायला लागलं होतं.

अरेच्या... नमन एक मिनिट थांब.. मी जरा जोरानेच ओरडलो. अरे जे महत्त्वाचं होतं. ते तर मी विसरलोच बघ, बोलण्याच्या नादात.

होतं असं कधी कधी. पण काय विसरलास ते तर सांग आधी?

पंढरपूरला आपण जेव्हा गेलो होतो. त्या इसमाने मला बोलावलं आणि मृत्यूबद्दल मला सांगितलं.

हे मला माहित आहे. तू काय विसरलास ते सांग?

अरे जाताना त्याने एक थैली मला दिली होती. मी तुझ्या बॅगमध्ये टाकली होती ती. देशील का जरा... कारण ती एकमेव वाट आहे त्याच्या आधाराने आपण मृत्यूच्या वाटचालीतून बाहेर निघू शकतो.

हा ती थैली मी बघितली आहे. बॅग दोनदा वावरतांना माझ्या हातात आली होती ती.

उघडून पाहिलीस का तिला कधी?

नाही मी उघडून तर पाहिले नाही. पण मला वाटते ती आता पण बॅगमध्येच असणार. कारण घरून निघताना मी बॅगमध्ये ठेवल्याचं आठवत आहे.

तू ती थैली आणून देतोस का? वाटल्यास मी इथेच थांबून तुझी वाट बघतो.

बरं थांबून राह... मी लगेच येतो.

काही वेळाने तो ती थैली घेऊन आला. आणि मला काहीतरी काम आहे, असं म्हणत घाईघाईने निघून गेला. खरंतर माझी आणि नमनची भेट म्हणजे या थैलीसाठीच होती. कारण मला आणि त्याला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढण्यासाठी, एकमेव गोष्ट म्हणजे ती थैली. आज इतक्या परिश्रमानंतर माझ्या हातात होती. चेहऱ्यावर एक प्रसन्न

हास्य उमटले होते. नक्कीच आशेचे किरण माझ्या हातात असल्याचा मला आभास येत होता.

तर मित्रांनो असं काय असतं त्या थैलीमध्ये? जे मृत्यूच्या तावडीतून पवनला बाहेर काढू शकत होतं? हॉस्पिटलमध्ये असलेला पवन काय सुधारू शकणार? मृत्यूच्या जाळ्यात अडकलेला पवन सुटणार काय? पेरजागढशी अजून पर्यंत कोणतेच नाते आले नाहीत ना!!! या सगळ्यांची उत्तरे मिळतील तुम्हाला दुसऱ्या भागात. काही चुकलं असेल तर देणे-घेणे. दुसरा भाग लवकरच येणार. पण त्यासाठी कळवा तुमचे मत...

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं.**
**कार्तिक हजारे यांचं ई साहित्यवरचं हे चवथं  पुस्तक.**

कार्तिक हजारे चंद्रपूर जिल्ह्यातील अतिदुर्गम ग्रामीण भागातील एक युवक. परिस्थितीच्या निखाऱ्यांनी त्यांच्यातील लेखकाला करपवण्याचा खूप प्रयत्न केला. त्यातून त्यांची शैली आणि भाषा पुण्यामुंबईच्या अभिजनवर्गापासून वेगळी. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये आशयाची ताकद आणि अभिव्यक्तीमध्ये ठोस मांडणी असूनही त्यांच्या साहित्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळात नव्हता. त्यांनीच म्हटाले आहे की लिहीण्यापेक्षा जास्त टेन्शन येते ते लिहीलेले दुसऱ्याला दाखवण्यात. पण ई साहित्यवर त्यांची पहिली तीन पुस्तकं गाजली, वाचकांनी वाखाणली तेव्हा मात्र त्यांना हुरूप आला.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर

लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे,

सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, प्रतिक म्हात्रे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत.

ही नवीन लेखकांची दमदार फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान